https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

QR कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २२० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.१ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राष्ट्र निर्माणाच्या कार्यात १०० वर्षांत संघाने महत्त्वाचे योगदान - पंतप्रधान नरेंद्र मोदी

### संघाला वाहिलेले १०० रुपयांचे विशेष नाणे आणि पोस्टाच्या तिकीटाचे अनावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीसोहळ्या निमित्त दिल्लीत आयोजित केलेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संघाच्या १०० वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. राष्ट्र निर्माणाच्या कार्यात १०० वर्षांत संघाने महत्त्वाचे योगदान दिले,असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी संघाला वाहिलेले १०० रुपयांचे विशेष नाणे आणि पोस्टाच्या तिकीटाचे अनावरण केले. १०० रुपयांच्या नाण्यावर भारत मातेची प्रतिमा कोरण्यात आली आहे. यावर बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच नाण्यावर भारतमातेला स्थान मिळाले आहे. दिल्लीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात या



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शताब्दीनिमित्त काढलेल्या १०० रुपयांच्या विशेष नाण्यावर राष्ट्राय स्वाहा, इदम राष्ट्राय, इदम ना मम असा संदेश कोरला आहे. सर्वकाही राष्ट्राला समर्पित आहे, सर्व काही राष्ट्राचे आहे, माझे काहीही नाही, असा या सुभाषिताचा अर्थ होतो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, राष्ट्र प्रथम ही संघाची विचारसरणी होती. त्यामुळे ब्रिटिश आणि निजामाच्या राजवटीत संघाला प्रचंड त्रास सहन करावा लागला.

**संघाची शताब्दी आणि विजयादशमी हा योगायोग नाही**

शताब्दी सोहळ्यात बोलत असताना मोदी म्हणाले, उद्या विजयादशमी आहे. या सणाचे आपल्या संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. वाईटावर चांगल्याचा विजय, असत्यावर सत्याचा विजय, अन्यायावर न्यायाचा विजय आणि अंधकारावर प्रकाशाचा विजय हे सणाचे प्रतीक आहे. १०० वर्षांपूर्वी या विजयादशमीनिमित्त संघाची स्थापना करणे हा योगायोग नव्हता. तर ते हजारो वर्षांपासून सुरू असलेल्या परंपरा, संस्कृतीचे पुनरुत्थान होते. आपली पिढी भाग्यशाली आहे की, आपण संघाचा शताब्दी सोहळा पाहू शकलो.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, संघाच्या अनेक शाखा समाजाच्या विविध घटकांसाठी काम करतात. इतक्या शाखा असूनही त्यांच्यात कधीही वाद झाले नाहीत. कारण सर्वांचा उद्देश एकच आहे. तो म्हणजे राष्ट्र प्रथम.स्थापनेपासूनच संघाने राष्ट्र कार्यात स्वतःला वाहून घेतले. स्वातंत्र्य लढ्यात संघाचे संस्थापक सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांना तुरूंगवास भोगावा लागला. त्यांच्याबरोबर संघाचे अनेक सदस्यही तुरुंगात गेले होते, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. त्यांनी म्हटले की, संघाने स्वातंत्र्य चळवळीत अनेकदा भाग घेतला होता आणि कित्येक स्वातंत्र्यवीरांना निवारा आणि मदत देण्याचे काम केले.पंतप्रधान मोदींनी पुढे म्हटले, १९४२ साली महाराष्ट्रातील चिमूर येथील आंदोलनात अनेक संघाच्या स्वयंसेवकांना ब्रिटिशांकडून त्रास सहन करावा लागला होता. एवढेच नाही तर स्वातंत्र्यानंतरही हैदराबादचे निजामांकडूनही संघाच्या स्वयंसेवकांना त्रास भोगावा लागला. गोवा आणि दादरा व नगर हवेलीच्या स्वातंत्र्यासाठीही संघाने आंदोलन केले होते.

## मग महाराष्ट्र सोडून चालते व्हा! भिवंडीतील मराठी वाद पेटला

### अबू आझमींना नवनीत राणा यांचा करार जबाब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

भिवंडीत मराठीची गरज काय? असा माज समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी दाखवला. कायम वादग्रस्त वक्तव्य करून स्वस्तात प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न कायम आझमी करत असतात. त्यातून त्यांनी असं वक्तव्य केलं. त्यांच्या वक्तव्यावरून वाद पेटला आहे. मनसेसह भाजप, सेना पक्ष त्यांच्यावर तुटून पडला. तर भाजप नेत्या नवनीत राणा यांनी आझमींना करारा जबाब दिला आहे. त्यांनी पाकिस्तानचा उल्लेख करत असे सुनावले. त्यामुळे येत्या काळात हा वाद अधिक पेटण्याची शक्यता आहे.ज्यांना मराठी भाषा आवडत नाही. त्यांनी महाराष्ट्र सोडून चालल जावं, असा जहरी टोला भाजप नेत्या नवनीत राणा यांनी अबू आझमींना लगावला. महाराष्ट्र म्हणून इथली भाषा म्हणून पहिला सन्मान केला पाहिजे. हे लोक तर म्हणतात पाकिस्तान देखील




चांगला आहे. पाकिस्तानसोबत सामना असला की यांच्याकडून एकही वक्तव्य येत नाही. मग यांच्याकडून काय अपेक्षा ठेवावी, असा खणखणीत टोला नवनीत राणा यांनी आझमींना लगावला.

## शेतकऱ्यासाठी महत्त्वाचा निर्णय, प्रत्येक गावात होणार पीक पाहणी, चंद्रशेखर बावनकुळेंचा आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई**

राज्यातील खरीप हंगाम २०२५ च्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या हितासाठी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देत संपूर्ण राज्यात शंभर टक्के पीक पाहणी करण्याचे निर्देश दिले आहेत. एक ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या महिन्याभरात होणारी ही पाहणी शेतकऱ्यांच्या नुकसानीचे अचूक मूल्यमापन करून तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. राज्य आपत्कालीन परिस्थितीतून जात असल्याने ही पाहणी काटेकोरपणे पार पाडण्यावर सरकारचा भर आहे.




शासनाने काढलेल्या परिपत्रकानुसार, खरीप हंगाम २०२५ साठी सध्या शेतामध्ये पीक पाहणी होत असून दिनांक १ ऑगस्ट २०२५ ते १४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत शेतकऱ्यांकडून व त्यानंतर दि.१५ सप्टेंबर २०२५ ते दि.२९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये सहाय्यक स्तरावरून पीक पाहणी करण्याचे निश्चित करण्यात आले होते. तथापि, शेतकऱ्यांना पीक पाहणीसाठीचा कालावधी दोन आठवडे वाढवून देण्यात आला आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी तसेच, दुबार पेरणी यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

मागील महिन्यातील ३० सप्टेंबरला शेतकऱ्यांची पिक पाहणीची मुदत संपलीआहे. यानंतर उर्वरित एका महिन्यामध्ये सहाय्यकांद्वारे उर्वरित सर्व शेतांची पीक पाहणी पूर्ण करणे आवश्यक आहे. दि.१ ऑक्टोबर २०२५ ते दि.३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये राहिलेल्या प्रत्येक गावातील पीक पाहणी न झालेल्या शेतांची पीक पाहणी सरकारकडून करण्यात येणार आहे. त्यासाठी हा एक महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे.

यासाठी प्रशिक्षण दिलेल्या सहाय्यकांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच सर्व सहाय्यक हे प्रत्यक्ष क्षेत्र परिस्थितीमध्ये जाऊन उर्वरित पीक पाहणी करून घेणार आहेत. जे शेतकरी गावातच आहेत परंतु त्यांची पीक पाहणी झालेली नाही अशा शेतक-यांना त्यांची पीक पाहणी सहायकामार्फत करण्यात येणार आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये सर्व गावातील शेतांची पिक पाहणी करून घेण्यात येणार असल्याचं शासनाने परिपत्रकात म्हटले आहे.

शेतकऱ्यांच्या पीक पाहणी कालावधीनंतर बहुतांश वेळा गावांपासून लांब राहणाऱ्या शेतकऱ्यांची पीक पाहणी शिल्लक राहिलेली असते. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये प्रत्यक्ष शेतकरी उपलब्ध नसल्यामुळे सहाय्यकामार्फत सदरची पीक पाहणी पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सहाय्यकाने केलेल्या पीक पाहणीची शंभर टक्के तपासणी ग्राम महसूल अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे व ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच मंजूर पीक पाहणी ७/१२ वर प्रसिद्ध होते.

राज्य ज्या आपात्कालीन परिस्थितीतून जात आहे त्यासाठी सदर पीक पाहणी अत्यंत महत्वाची असल्यामुळे सहाय्यकांची, तसेच ग्राम महसूल अधिकारी यांची उर्वरित एक महिन्याच्या कालावधीतील भूमिका राज्यात १००% पीक पाहणी होण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक जिल्ह्यातील सर्व गावांची पीक पाहणी शंभर टक्के होईल, याची दक्षता घेण्यात यावी असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

## मुख्यमंत्र्यांची हिरवी झेंडी, शिक्षणमंत्र्यांची शिष्टाई सफल, अखेर शिक्षकांना दिलासा देणारी शासन भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नागपूर**

अनेक वर्ष सेवा झालेल्या शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच टेट देणे बंधककारक करण्याची बाब ऐरणीवर आली होती. ही अट रद्द न केल्यास ४ ऑक्टोबर रोजी राज्यव्यापी मोर्चा काढण्याचा ईशारा शिक्षक संघटनानी दिला होता. तसेच याप्रकरणी तामिळनाडू सूत्र अंमलात



आणण्याची सूचना महाराष्ट्र शासनास करण्यात आली होती. या वयात आम्ही पात्रता परीक्षा कशी देणार ? असा या ज्येष्ठ शिक्षकांचा सवाल होता. त्याची त्वरित दखल शासनाने आज घेतली आहे. शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर यांनी संघटनेच्या भावना लक्षात घेऊन सर्व संघटना प्रतिनिधीची बैठक आज नागपुरात बोलावली.

शिक्षक नेते विजय कोंबे या बैठकीबाबत माहिती देतांना म्हणाले की परीक्षेबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली, याचा आनंद आहे. आम्ही परीक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची मागणी केली होती. ती मान्य झाली. शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सुरवातीलाच हे स्पष्ट केले की या विषयावर मुख्यमंत्र्यांशी प्रथम चर्चा केली आहे. म्हणून ही शासनाची भूमिका आहे. राज्य शासनातर्फे सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका लवकरच दाखल केल्या जाईल. त्याची प्रक्रिया सूरू करणार. हे होईपर्यंत राज्यातील पुरस्थिती पाहता मोर्चा काढू नये, असे आवाहन मंत्री महोदयांनी केल्याची माहिती विजय कोंबे यांनी दिली.

## बातमी प्रकाशित होताच; त्या शाळेला विस्तार अधिकाऱ्यांनी दिली भेट

### विदर्भ प्रजासत्ताक च्या बातमीचा परिणाम : तिन्ही लेटलतीफ शिक्षकांची घेतली माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ मोर्शी**

मोर्शी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या विष्णोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षणापेक्षा साफसफाई अधिक केली जाते, अशी स्थिती सध्या निर्माण झाली आहे. या शाळेत विद्यार्थी पुस्तकांऐवजी झाडू घेऊन शाळेच्या स्वच्छतेचे काम करताना दिसत आहेत, तर शिक्षक वेळेवर न हजर राहत कभी भी आवो, कभी भी जाओ अशा पद्धतीने शाळा चालवत असल्याचा आरोप पालकांकडून केला जात असल्याचे वृत्त लोकप्रिय दैनिक विदर्भ प्रजासत्ताक या वृत्तपत्रामध्ये मंगळावर ३०ऑक्टोबर रोजी प्रकाशीत


विदर्भ प्रजासत्ताक
विद्यार्थ्यांच्या हाती झाडू शिक्षक वेळेवर गैरहजर
विष्णोरा शाळेतील बेजबाबदार कारभार

करण्यात आले होते आणि त्याच बातमीची दखल घेत शाळेत आज दि.१ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर गायकवाड यांनी भेट देत शाळेची पाहणी



केली व तिन्ही शिक्षकांची विद्यार्थ्यांकडून माहिती जाणून घेतली.

विष्णोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तीन शिक्षक असूनही वेळापत्रकानुसार उपस्थित राहण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. शाळेच्या गेटसमोर असलेल्या रस्त्यावर मोठे भगदाड पडले असून, ते विद्यार्थी आणि पालकांच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरत आहे. याकडे शिक्षक व शाळा प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे भविष्यात अपघात होण्याची शक्यता आहे. या गंभीर समस्येकडे विस्तार अधीकारी ज्ञानेश्वर गायकवाड यांनी लक्ष देणार असल्याचे सांगितले तर शाळेतील तिन्ही शिक्षकांनी कबूल केली असून पुन्हा असे घडणार नसल्याचे सांगितले.

शाळेतील आणखी एक गंभीर बाब म्हणजे इमारतीवर दिवसभर माकडांचा विहार असतो. ही माकडे टिनावर उड्या मारून आवाज करतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष भंग होते. यामुळे शैक्षणिक वातावरणावर विपरीत परिणाम होत आहे. पालकांनी या माकडांचा बंदोबस्त करण्याची मागणी शाळा प्रशासनाकडे केली आहे.या सर्व बाबींकडे शिक्षण विभाग वनविभागाकडे तक्रार करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले तर शाळेच्या गेटसमोर जो मोठा गड्डा आहे तो हि बुजविणार असल्याचे विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर गायकवाड यांनी सांगितले.

## केंद्र सरकारचं दिवाळी गिफ्ट; कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात भरघोस वाढ

### पेन्शनधारकांनाही होणार फायदा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली**

केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारनं कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय घेत खूशखबर दिलीय. सरकारनं कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या महागाई भत्त्यात वाढ करत त्यांना दिवाळी भेट दिलीय. हा महागाई भत्त्यात जुलैपासून लागू होईल. दरम्यान सरकार महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय दिवाळीच्या आसपास घेत असते. महागाई भत्त्यातील ही वाढ ७ व्या वेतन आयोगांतर्गत



येणाऱ्या सर्व केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना तसेच निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना लागू असेल.

केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारनं कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय घेत खूशखबर दिलीय. सरकारनं कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या महागाई भत्त्यात वाढ करत त्यांना दिवाळी भेट दिलीय. हा महागाई भत्त्यात जुलैपासून लागू होईल. दरम्यान सरकार महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय दिवाळीच्या आसपास घेत असते. महागाई भत्त्यातील ही वाढ ७ व्या वेतन आयोगांतर्गत येणाऱ्या सर्व केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना तसेच निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना लागू असेल.

सरकारनं याआधी १ जानेवारी २०२५ पासून महागाई भत्त्यात २ टक्क्यांची वाढ केली होती. यामुळे साधरण १.१५ कोटी केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांना आणि पेन्शनधारकांनाही फायदा मिळेल. या वाढीमुळे माहागाई भत्ता, बेसिक सॅलरीच्या ५३ टक्क्यांनी वाढून ५५ टक्के झाला होता.

## मातोश्री ग्रामसमृद्धी शेत, पांदण रस्ते रस्त्यांमुळे ग्रामीण अर्थकारणाला नवी दिशा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

शेतीत ये-जा करण्यासाठी आवश्यक असलेल्या शेत-पांदण रस्त्यांची कामांना अमरावती जिल्ह्यात गती मिळाली आहे. मातोश्री ग्रामसमृद्धी शेत, पांदण रस्ते योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या ४२०३ कामांपैकी, १ हजार २३२ कामांनी प्रत्यक्षात बांधकाम सुरू केले आहे. ज्यामुळे शेतमाल वाहतूक आणि शेतीच्या कामांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जिल्ह्यातील ४ हजार २०३ विकासकामांना गती मिळाली आहे. शासनाने मंजूर केलेल्या कामांना प्रशासकीय यंत्रणेने त्वरित कार्यवाही करत ३ हजार ९० कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. यातील ४४९ कामे पूर्ण झाली असून, १ हजार २३२ कामे सध्या वेगाने सुरू आहेत. यामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा मजबूत होण्यास मदत मिळणार आहे. पूर्ण झालेल्या ४४९ कामांमुळे नागरिकांना थेट सुविधा मिळण्यास सुरुवात झाली आहे. सध्या सुरू असलेली १ हजार २३२ कामे येत्या काही कालावधीत पूर्ण होवून जिल्ह्यातील रस्ते आणि इतर पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होईल.

अनेक पंचायत समित्यांनी विकासकामांना चांगली गती दिली आहे. वरुड पंचायत समितीने सर्वाधिक १४० कामे यशस्वीरित्या पूर्ण केली आहेत. मोर्शी तालुक्यात ६६१ कामांपैकी ३४८ कामांना तांत्रिक मान्यता मिळून २०२ कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. चांदूर बाजार मध्ये ५०४ पैकी ४५० कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून, सध्या १३९ कामे वेगाने सुरू आहेत. प्रशासकीय यंत्रणा मंजूर कामांना तातडीने कार्यान्वित करीत आहे. उर्वरित १ हजार ११३ कामांना तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता देण्याचे काम सुरू असून, लवकरच ही कामेही सुरू होतील, असा विश्वास जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## संपादकीय ......

# कान फोडून बहिरेपणा, मेंदू बधिर करणाऱ्या डीजेला आवरा

महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली आहे. माठवाडा या कायम दुष्काळी प्रदेशात पाऊस काळ बनून कोसळला. शेती उद्ध्वस्त झाली, शेतकरी मोडून पडला. शाळा, कॉलेजात जाणार्या मुलामुलींची वह्या-पुस्तके वाहून गेली. जिथे घरच राहिले नाही, तिथे शाळेत जाण्याचा आणि सण, उत्सव साजरे करण्याचा उत्साह तरी ते कुठून आणणार. एकीकडे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात हे विदारक चित्र असताना दुसरीकडे मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये सध्या डीजेच्या तालावर तरुणाई रास-गरबा-दांडिया खेळत आहे. हा भारत आणि इंडियातील फरक. एकीकडे प्रचंड गरिबी आणि दुसरीकडे प्रचंड श्रीमंती, ही दरी वाढत चालली आहे. त्यामुळेच आपली उंची जीवनशैली, चकचकीत गाड्या, डीजेच्या तालावर लेझर लाईटच्या झगमगाटात रात्रभर थिरकणे हे प्रकार वाढले आहेत. भारत हा सण, उत्सवांनी भरलेला आणि भारलेला देश. आपल्या देशात सण, उत्सवांची कमतरताच नाही. मात्र आता आवाजाचा दणदणाट आणि लेझर लाईट्सच्या झगमगाटाने हे सण, उत्सव साजरे केले जात आहेत, ते पाहून ही संस्कृती नसून विकृती असल्याचे नाईलाजाने म्हणावे लागते. यामध्ये कोणताही धर्म आणि धर्मिय मागे नाहीत. सर्वच धर्मियांच्या सण, उत्सवांमध्ये जयंती, मयंतीमध्ये, वाढदिवसापासून लग्नसोहळ्यापर्यंतच्या वरातीमध्ये लाऊडस्पिकर्सच्या भिंती उभ्या करून सामान्यांना छळले जाते.

पुण्यातील कोथरूड येथील जीत मैदानावर सुरू असलेला रास दांडिया आणि तिथे थिरकणारी तरुणाई गेल्या काही वर्षांपासून बेधुंद होऊन नाचते. यांना जगाशीच काय, या मैदानाच्या आसपास राहणार्या १०-१२ हजार नागरिकांशीही देणेघेणे नाही. त्यामुळेच डेसिबलचे सर्व नियम तोडूनमोडून त्यांचा धिंगाणा सुरू असतो. यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी यंदा भारतीय जनता पक्षाच्या खासदार मेधा कुलकर्णी यांच्याकडे तक्रार केली. मेधाताई या पुण्यातील मध्यमवर्गीय कुटुंबातून राजकारणात आलेल्या महिला. पुणेकरांच्या सर्व सवयी आणि त्रासाची त्यांना पूर्ण जाणीव. त्यांनी एक खासदार म्हणून पोलिसांना रास दांडियाचा वाढलेला आवाज कमी करण्याच्या सूचना केल्या. एकदा, दोनदा फोन करून काहीही झाले नाही. अखेर त्यांनी स्वत: जीत मैदानात धडक देऊन कार्यक्रम बंद करण्यास सांगितला. मेधाताई आज सत्ताधारी पक्षाच्या, त्यातही भाजपच्या खासदार असल्यामुळे कोणत्याही संस्कृती रक्षकांनी त्याविरोधात आवाज केला नाही. अन्यथा तुम्हाला हिंदूंचेच सण दिसतात का, असा सूर दुसरं कोणी असतं तर नक्कीच निघाला असता. मेधा कुलकर्णींनी स्पष्टच सुनावले की, हा धागडधिंगा म्हणजे हिंदू धर्म नाही. अर्धवट कपड्यातील मुला-मुलींनी रात्रभर नाचणे, नर्तिका आणून अश्लिल गाण्यावंर नाचवणे, ही हिंदू धर्मात घुसलेली विकृती आहे. हिंदू धर्मातच अशा प्रकारची अश्लिलता का वाढली आहे. आमच्या धर्माविरोधातील हे मोठे कारस्थान आहे. तरुणाईमध्ये मोठ्या प्रमाणात पोटेंशियल आहे. मात्र त्यांच्या ऊर्जेला भलत्याच मार्गाकडे नेण्यासाठी असे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत, असले कार्यक्रम यापुढे हाणून पाडू. मेधाताई यांच्या या निर्धाराचे स्वागतच आहे. त्यांनी फक्त आता पुण्यापुरतं मर्यादित न राहता संबंध महाराष्ट्रात याविरोधात आवाज उठवला पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात जाऊन त्यांनी असला धागडधिंगा बंद पाडला पाहिजे. विकृतीच्या नि:पाताची सुरुवात दुर्गोत्सवाच्या निमित्ताने विद्येच्या माहेरघरातून होत असेल तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. या घटनेने सार्वजनिक उत्सवात वाढलेला डीजेचा आवाज आणि त्यामुळे होणार्या त्रासाची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली.

सण-उत्सव साजरे झालेच पाहिजे, ते आपल्या सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. मात्र ते साजरे करत असताना सामाजिक भान जपणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. आठ दिवसांपूर्वीच बिहारमध्ये एका दोन महिन्यांच्या मुलीचा डीजेच्या आवाजामुळे मृत्यू झाला. विश्वकर्मा पूजेनिमित्त लावलेल्या डीजेच्या आवाजाने सोनाक्षी नावाच्या निरागस मुलीला हृदयविकाराचा झटका आला आणि त्यात तिचा जीव गेला. त्याआधी जून महिन्यात बिहारमधीलच शिवहर जिल्ह्यात १५ वर्षीय मुलगी डीजेच्या आवाजाने बेशुद्ध पडली आणि तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ७० डेसिबलपर्यंतचा आवाज कानांच्या पडद्यासाठी सुरक्षित मानला जातो. त्यापुढील आवाजाने कानाचे पडदे फाटू शकतात. मोठा आवाज कानावर आदळत राहिल्याने एड्रेनालिन हार्मोन वाढतो, यामुळे रक्तदाब वाढतो. हृदयाचे ठोके वाढतात. उच्च डेसिबलमुळे मेंदूवरही परिणाम होऊ शकतो. स्मरणशक्ती कमी होते. तशीही सध्या समूहाची स्मरणशक्ती कमी झालेली आहेच, सण, उत्सव संपल्यानंतर सर्वांनाच या गोष्टींचा विसर पडतो. गर्भवती, नवजात बालके, लहान मुले, वृद्ध यांची प्रतिकारशक्ती कमी असल्यामुळे त्यांच्यावर या आवाजाचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे आता कुठेतरी थांबण्याची गरज आहे. यंदाच्या गणपती उत्सवात पुणेकरांनी चांगला पायंडा पाडला, जिवंत देखावे सादर केले. सोलापूरकरांनी डीजे बंदीचाच निर्णय घेतला. ही बोटावर मोजता येतील अशी उदाहरणे असली तरी कुठेतरी सुरुवात झाली आहे, हेही नसे थोडके. आपले सर्व सण, उत्सव हे शेतीच्या ऋतूचक्रानुसार साजरे केले जातात. त्यातून सामाजिक, भावनिक एकोप्याची शिकवण दिली जाते. उत्सवातून समाजप्रबोधन, नवीन विचारांचा प्रचार, प्रसार होणे अपेक्षित आहे. अमेरिकेच्या ट्रम्प टॅरिफला आपण इष्टापत्ती मानून स्वदेशीचा नारा देत आहोत. तर सण, उत्सवातील धागडधिंगा बंद करून निसर्गाशी, आप्त स्वकियांच्या सुख-दु:खाशी स्वत:ला जोडून घेण्याची, निसर्गाकडे परत फिरण्याची वेळ आली आहे. हे संकेत वेळीच ओळखले पाहिजे.

# डाळिंबातील हस्त बहारात चांगल्या सेटिंगसाठी काय नियोजन करावे




**दि.१विदर्भ प्रजासत्ताक-** डाळिंबातील हस्त बहार (सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये फुलं येणारा बहार) घेण्यासाठी झाडावर ताण आणणे, छाटणी करणे आणि योग्य खतपाणी व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे. या काळात कसे व्यवस्थापन करावे, हे जाणून घेऊयात...

डाळिंब हस्त बहार नियोजन (सप्टेंबर-ऑक्टोबर पीक नियमन)

बागेची अवस्था : (ताण सोडणे आणि बहार नियमन)

**बागेची मशागत**

पाऊस/ पावसाळा संपल्यानंतर, २०-२५ दिवसंपर्यंत पाणी देऊ नये.

खतांची मात्रा देताना फळबागेतील पडलेली पाने.

काडीकचरा काढून टाकावा अथवा जमिनीत पुरून टाकावा.

बागेतील झाडांना बसलेल्या ताणाच्या तीव्रतेनुसार इथेफॉनचा वापर करून पानगळ करावी.

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी विशेष**

बेमोसमी पाऊस किंवा अन्य कारणांमुळे झाडांना योग्य ताण बसला नसल्यास, इथेफॉनच्या (३९ एसएल) दोन फवारण्या घ्याव्यात.

पहिली फवारणी ०.९ मिलि प्रति लिटर पाणी याप्रमाणे व दुसरी इथेफॉनची फवारणी ५ ते ८ दिवसांनी पानांच्या पिवळेपणानुसार १ ते १.५ मिलि प्रति लिटर पाणी याप्रमाणे घ्यावी.

प्रत्येक इथेफॉन फवारणीमध्ये १२-६१-० किंवा ०-५२-३४ (५ ग्रॅम प्रति लिटर पाणी) मिसळावे.

झाडांना योग्य ताण बसला असल्यामुळे पाने पिवळी असताना, इथेफॉन (३९ एसएल) १ मिलि प्रति लिटर पाणी अधिक १२-६१-० किंवा ०-५२-३४ ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारावे.

जर फांद्यांची घनता जास्त असेल, तर हवा खेळती राहण्यासाठी व सूर्यप्रकाश पोहोचण्यासाठी पेन्सिल आकाराच्या फांद्या शेंड्याकडून १० ते १५ सेंमी. कट करून हलकी छाटणी करावी आणि खोडापासूनचे फुटवे (वॉटर शूट) काढावेत.

(सोसाट्याचा वारा व पावसाचा अंदाज घेवुनच पिकावर कीटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी)

**- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी .**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

आरोग्य संपदा आहार

## दारू प्यायल्यानंतर भूक का वाढते? कारण ऐकून तुम्हालाही बसेल धक्का



**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

दारू ही आरोग्यासाठी हानिकारक असल्याचं आपण सतत ऐकतो. तरीदेखील जगभरात लाखो लोक वेगवेगळ्या कारणांसाठी दारू पितात. काही जण एन्जॉयमेंटसाठी, काही मित्रांसोबत वेळ घालवण्यासाठी, तर काहीजण केवळ सवयीपोटी दारू घेतात. भारतात मात्र दारू पिणं म्हणजे एक सोशल फंक्शन समजलं जातं. दारू घेताना सोबत भरपूर स्नॅक्स, चखना किंवा जेवण असणं आवश्यक मानलं जातं. पण तुम्हाला माहिती आहे का, दारू प्यायल्यानंतर आपल्याला जास्त भूक का लागते? यामागे काही वैज्ञानिक कारणं दडलेली आहेत. (why alcohol increases hunger science reason)

**मेंदूवर होणारा परिणाम**

दारू प्यायल्यानंतर आपल्या मेंदूतील हायपोथॅलेमस या भागावर थेट परिणाम होतो. हा भाग भूक, शरीराचं तापमान आणि इतर महत्त्वाच्या प्रक्रिया नियंत्रित करतो. संशोधनानुसार, दारूमुळे -सठझ न्युरॉन्स सक्रिय होतात, जे मेंदूला भुकेचा सिग्नल देतात. त्यामुळे दारू घेतल्यानंतर आपल्याला अचानक भूक लागते.

चव आणि वास अधिक तीव्र होतो

दारू प्यायल्यानंतर आपल्या जिभेची चव घेण्याची आणि नाकाची वास ओळखण्याची क्षमता वाढते. त्यामुळे अगदी साधं खाणंही अधिक चविष्ट वाटू लागतं. यामुळे आपण गरजेपेक्षा जास्त खाणं करतो.

ब्लड शुगरची पातळी कमी होणे

अल्कोहोलमुळे शरीरातील ब्लड शुगरची पातळी खाली येते. शरीराला ऊर्जा हवी असल्याने ब्रेन लगेच खाण्याचा सिग्नल देतो. अशा वेळी विशेषत: गोड, खारट किंवा कॅलरी जास्त असलेलं खाणं खायची इच्छा तीव्र होते.

**कंट्रोल कमी होणं**

दारू घेतल्यानंतर निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. स्वत:वरचं नियंत्रण सैल होतं. त्यामुळे आपण किती खावं किंवा काय खावं यावर मर्यादा राहत नाहीत. परिणामी तळलेले, तेलकट किंवा जंक फूड अधिक प्रमाणात खाल्ले जातात.

दारू प्यायल्यानंतर भूक वाढणं हे अगदी नैसर्गिक आहे. यामागे मेंदू, ब्लड शुगर आणि संवेदना यांचं विज्ञान दडलेलं आहे. मात्र, हे माहिती असलं तरी दारू आरोग्यासाठी हानिकारक असल्यामुळे तिचं सेवन टाळणंच चांगलं.

# बाल गुन्हेगारांचे वय १८ वरून १६ वर आणणे अत्यंत आवश्यक

गेल्या काही वर्षांत बाल गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालल्याचे दिसून येते, जो समाज आणि प्रशासनासाठी एक गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. पूर्वी बाल गुन्हे म्हणजे किरकोळ चोरी, शाळा बुडवणे किंवा भटकणे इतके मर्यादित होते. मात्र, आता हे स्वरूप बदलून खून, बलात्कार, दरोडा, आणि सायबर गुन्हे यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्येही बालकांचा सहभाग वाढताना दिसत आहे.चिंताजनक बाब म्हणजे काही गंभीर गुन्ह्यांमध्ये १२ ते १६ वयोगटातील बालकांचा सहभाग वाढत आहे. या वयात मुले भावनिकदृष्ट्या अपरिपक्व असतात आणि पटकन वाईट संगतीच्या किंवा चुकीच्या विचारांच्या प्रभावाखाली येतात.*हेतुपुरस्सर वापर: अनेकदा मोठी गुन्हेगारी टोळ्या या लहान वयाच्या मुलांना गुन्हे करण्यासाठी वापरतात, कारण कायद्यानुसार त्यांना प्रौढांइतकी कठोर शिक्षा होत नाही. बालकांचे गुन्हेगारीकडे वळणे हे एकाच कारणाचे परिणाम नसून, अनेक सामाजिक, कौटुंबिक आणि वैयक्तिक घटकांचे मिश्रण आहे.वाईट संगत आणि व्यसन: अमली पदार्थ आणि मद्यपानाचे व्यसन, तसेच गुंड प्रवृत्तीच्या मित्रांची संगत, यामुळे मुलांचे वर्तन हिंसक आणि बेजबाबदार बनते. अमरावती शहरात अमली पदार्थांचा वापर वाढला आहे. भारतात किशोर न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम,लागू आहे. या कायद्यानुसार, १८ वर्षांपर्यंतच्या व्यक्तींना 'बालक' मानले जाते.गुन्हेगार मुलांना अनेक प्रकारच्या गुन्ह्यांसाठी वापरत असल्यामुळे बालगुन्हेगारीची वयोमर्यादा पुन्हा निश्चित करण्यावर विचार करण्याची गरज असल्याचे दिल्ली उच्च न्यायालयाने मत व्यक्त केले आहे.सध्याची तरतूद (२०१५ चा कायदा): सध्याच्या कायद्यानुसार, गंभीर गुन्हे करणाऱ्या १६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांवर प्रौढांप्रमाणे खटला चालवता येतो की नाही, याचा निर्णय 'न्याय मंडळा'कडून प्राथमिक तपासणीनंतर घेतला जातो.बालगुन्हेगारीच्या वयाबद्दल आणि कायद्याबद्दल सतत चर्चा आणि फेरविचाराची मागणी होत आहे, विशेषत: गंभीर गुन्हे आणि अंमली



पदार्थांसारख्या प्रकरणांमध्ये. बाल गुन्हेगारांचे वय किती असावे यावर भारतात आणि जगभर खूप विचार आणि चर्चा झाली आहे. कायद्यांमध्ये वेळोवेळी बदलही झाले आहेत.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी गुंगीकारक पदार्थ संबंधित गुन्ह्यांसाठी बालगुन्हेगारांचे वय १८ वरून १६ वर्षे करण्याच्या दिशेने विचार करत असल्याचे विधान केले आहे. अल्पवयीन मुलांचा अंमली पदार्थांच्या तस्करीसाठी वापर वाढल्याने हा विचार सुरू आहे.२०१५ मध्ये महत्त्वाचा बदल: 'बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०१५' मध्ये १६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी एक मोठा बदल करण्यात आला आहे. जर या वयोगटातील मुलांनी अत्यंत गंभीर स्वरूपाचा गुन्हा केला असेल, तर 'बाल न्याय मंडळाच्या' मूल्यांकनानंतर, त्यांच्यावर प्रौढांप्रमाणे खटला चालवण्याची तरतूद आहे. या संपूर्ण विषयांवर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. सध्याची चिंताजनक परिस्थिती पाहता महाराष्ट्रातील सर्व लोकप्रतिनिधी, विधीतज्ञ, वकिलांच्या संघटना, सामाजीक कार्यकर्त्यांनी बाल गुन्हेगाराचे वय १६ पर्यंत आणण्यासाठी सरकारवर दबाव गट निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी सर्वांना विनंती आहे.



**नितीन देशमुख**
माजी नगरसेवक, अमरावती.
- ९८९०० ९८७८७

# ३१११ किलो सुकामेवा नवैद्य अर्पण

**श्री अंबादेवी व श्री एकविरा देवी आरती मंडळाचा उपक्रमा**

## ९ कन्येच्या हस्ते पूजन करून देवीला प्रसाद, पहाटेपासून दर्शनार्थी भाविकांना प्रसादाचे वाटप सुरु

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१अमरावती-** दरवर्षी प्रमाणे यंदाही भगवती श्री अंबादेवी व श्री एकविरा देवी ला महाअष्टमी निमित्त मंगळवार ३० सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १० वा. सुकामेवाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. श्री अंबादेवी व श्री एकविरा देवी आरती मंडळाचे वतीने हा प्रसाद ९ कन्यांच्या हस्ते देवीला अर्पण करण्यात आला. त्यानंतर १ सप्टेंबरला पहाटेपासून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना या प्रसादाचे वितरण सुरु करण्यात आले.सुमारे ३१ वर्षापासून निरंतर नैवेद्य अपर्ण आणि वितरीत करण्याची परंपरा सुरु आहे. श्री अंबादेवी व श्री एकविरा देवी आरती मंडळ, अमरावती



आपलेग्रामवासी, मित्र परिवार आणि आई जगदंबेचे भाविक भक्तांच्या सहयोगाने हा महाप्रसादाचा संकल्प पुर्णत्वास नेण्यात येत आहे. नवमीला बुधवार दर्शनाला येणाऱ्या भाविक भक्तांमध्ये हा प्रसाद वितरण सुरु झाले आहे. या प्रसादामध्ये काजू, बदाम, अक्रोड, अंजीर, चमच मखड़ी साखर, साखर, मनुका, खारिक, खोबरे, चारोळी, गोडंबी आदींचा या सुका मेवा प्रसादामध्ये समावेश असतो. यावेळी आरतीला आ. सुलभाताई खोडके, यश खोडके, ॲड. प्रशांत देशपांडे, अविनाश मार्डीकर, रिना नंदा, लकी नंदा, गोपीचंद भांबोरे, आदींसह अन्य मान्यवर उपस्थित होते.प्रसाद वितरण नियोजनासाठी अध्यक्ष हरीहर गावंडे, मानाचे ताट अर्पण करणारे विजय निकम, प्रशांत धामणे (नाशिक), सचिव उमेश घोंगडे, मंगेश कुडे, निखिल ठाकरे, भरत धनोड कर, भैय्या चंदेल, धिरज गावंडे, प्रतिक इंगळे, प्रा. गिरीष राजगुरू, अभय बपोरीकर, अजय सारस्कर, कृष्णा चतुर्वेदी, मनीष देशपांडे, प्रवीण माणिकपुरे, जगदिश पेंढारकर, परागकुपटे, प्रसाद पिदळी यांनी परीश्रम घेतले.

# पूरग्रस्तांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## टंचाईच्या सर्व सवलती मिळणार, जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याला प्राधान्य, आपत्तीग्रस्तांकडून वसुली नको; बँकाना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१ मुंबई,**

राज्य शासन पूरग्रस्ताच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. या भागातील शेतकरी, आपत्तीग्रस्त नागरिकांना टंचाई प्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाची वसुली थांबवावी, असे निर्देशही बँकाने दिल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकरी सध्या अडचणीत आहे. हे लक्षात घेऊन बँकांना वसुली थांबवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पूरग्रस्त कुटुंबांना गहू-तांदूळ, डाळी व आवश्यक वस्तूंचे कीट वितरित करण्यात येत आहे. विहीर खचणे, शेतजमीन खरडून जाणे, अशा केंद्र सरकारच्या निकषाबाहेर



जाऊन, झालेल्या नुकसानीवरही राज्य सरकार स्वतंत्र मदत करणार आहे. नुकसानीचे पंचनामे दोन-तीन दिवसांत पूर्ण होऊन पुढील आठवड्यात केंद्राला प्रस्ताव पाठवला जाणार आहे.

मात्र, केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारने स्वतःच्या निधीतून मदत सुरू केली असून नंतर केंद्राकडून ती रक्कम 'रिइम्बर्समेंट'च्या स्वरूपात मिळेल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असली तरी आपत्ती व्यवस्थापन नियमावलीत ( मॅन्युअल) अशी व्याख्येचा समावेश नाही.

असे असले तरी टंचाई निवारण काळातील निकषांप्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १ ऑक्टोंबर २०२५

शहर/ग्रामिण

# भारतीय जनता युवा मोर्चा अमरावती शहर तर्फे 'नमो युवा रन' मॅरेथॉन स्पर्धा थाटामाटात संपन्न



## नशा मुक्त अभियान या थीम सोबत सेवा पंधरवाडा अंतर्गत आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** भारताचे यशस्वी पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांच्या जन्मदिनापासून म्हणजेच १७ सप्टेंबर पासून ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती पर्यंत म्हणजेच २ ऑक्टोबर पर्यंत भारतीय जनता पार्टी संपूर्ण भारतामध्ये सेवा पंधरवडा साजरा करीत आहे,या अंतर्गत भारतीय जनता पार्टी जे काही विविध कार्यक्रम राबवित आहे त्यामध्ये महत्त्वपूर्ण कार्यक्रम युवा मोर्चाला 'नमो युवा मॅरेथॉन' नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्याचा कार्यक्रम दिल्या गेला होतायानुसार भाजपा अमरावती शहर जिल्ह्याचे अध्यक्ष मा.डॉ.नितीनजी धांडे यांच्या मार्गदर्शनात तसेच भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष विक्की शर्मा यांच्या नेतृत्वात भाजप युवा मोर्चा शहर जिल्हा तर्फे देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्य सुरू असलेल्या सेवा पंधरवाडा कार्यक्रमांतर्गत नशा मुक्त भारत नमो युवा रन मॅरेथॉन स्पर्धा थाटामाटात संपन्न झाली.पुरुषांकरिता पाच किलोमीटर, आणि महिलांकरिता तीन किलोमीटर अशी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती,पुरुष गट आणि महिला गट यामध्ये यांना रोख बक्षिसे आणि प्रमाणपत्र तसेच सन्मानपत्र देण्यात आले,यावेळी भाजप नेते राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे तसेच भाजप अमरावती शहर अध्यक्ष .डॉ.नितीन धांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिपप्रज्वलन करण्यात आले असून स्पर्धेची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली.

या मॅरेथॉन स्पर्धे मध्ये युवती मधून पहिले पारितोषिक वैष्णवी वानखडे यांना, दुसरे पारितोषिक मीनाक्षी खरपाटे यांना,तिसरे पारितोषिक संजल बनकर यांना,चौथे पारितोषिक समीक्षा आमझरे यांना,पाचवे पारितोषिक पायल मगराडे यांना तर सहावे पारितोषिक स्वाती ठाकरे यांना देण्यात आले तसेच युवकानं मध्ये पहिले पारितोषिक नितीन हिवराळे यांना,दुसरे पारितोषिक प्रतीक गेडाम यांना,तिसरे पारितोषिक उजेर खान यांना,चौथे पारितोषिक क्रिश राणे यांना,पाचवे पारितोषिक मुकेश उईके यांना तर सहावे पारितोषिक गौरव इंगळे यांनाभाजप नेते खासदार डॉ.अनिल बोंडे साहेब यांच्या तर्फे देण्यात आले.यावेळी भाजप नेते रवींद्रजी खांडेकर, प्रशांतभाऊ देशपांडे,भाजप शहर जिल्ह्याचे महामंत्री बादलजी कुळकर्णी,राधा ताई कुरिल,ललित समदुरकर,चेतन पवार तसेच भाजपा युवा मोर्चा अमरावती शहराचे अध्यक्ष विक्कीजी शर्मा,सुरेखा लुंगारे,श्रद्धा गहेलोत,संजय नरवणे,राजू कुरिल,संजय तीरथकर,किर्ती सराफ, प्रविण रुद्रकार,आदित्य खैरकर,आकाश पाटील,शुभ साहू,उमंग मोंगा,अनिकेत तारवाणी,भूषण हरकुट,श्रवण मेहरे,विजय चावला,योगेश श्रीवास्तव,अनुप पुंड,यश शर्मा,रुपेश गुप्ता, अमोल,ऋषिकेश तेलकर,सुमित गुल्हाने, तुषार अंभोरे,रोहित गुप्ता,सनी दुधवानी, शुभम वऱ्हेकर, विकास सुने, अथर्व पांडव, राम कुंभारकर, साहिल शर्मा,वैभव धनदार,साहिल बुंदेले,जय गिरनारे सहित भाजपा युवा मोर्चा अमरावती शहराचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.यावेळी या संपूर्ण मॅरेथॉन स्पर्धे मध्ये अत्यंत मोलाचे सहकार्य हे अतुल पाटील सर आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे लाभले तसेच भाजपा मेडिकल सेल अमरावती जिल्हा शहर संयोजक डॉ.राधा ताई सावदेकर सचिव डॉ. सागर धनोडकर व त्यांच्या चमू मार्फत प्रथमोपचार करीता सहकार्य लाभले.यावेळीभाजप अमरावती शहरातील सर्व पदाधिकारी/ कार्यकारिणी सदस्य, नगरसेवक, मोर्चा सेल,आघाडी,प्रकोष्टचे अध्यक्ष व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन भाजप अमरावती शहर महामंत्री बादलजी कुळकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन भाजप युवा मोर्चा अमरावती शहर अध्यक्ष विक्कीजी शर्मा यांनी केले.

# महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने

## अमरावतीतील उद्योजकांना'मैत्री' पोर्टलचा लाभ घेण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती,** महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२७ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचविण्याचे महाराष्ट्र शासनाचे ध्येय आहे. या ध्येयपूर्तीसाठी आणि राज्यात उद्योग स्थापन करण्यासाठी उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्रातील गुंतवणूकदारांना सर्व आवश्यक परवाने, मंजुरी, ना-हरकती, सवलती व तक्रार निवारण या सेवांचा वेगवान, पारदर्शक आणि सुलभपणे लाभ एकाच ठिकाणी देण्यासाठी एक खिडकी प्रणाली म्हणून उद्योग विभागांतर्गत 'मैत्री' कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. जिल्ह्यामध्ये सध्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाअंतर्गत एकूण १ लाख ६ हजार ३९० उद्योग (१, लाख ५ हजार ५४० सूक्ष्म, ८०७ लघु व ४३ मध्यम) नोंदणीकृत आहेत. या उद्योजकांना लाभ व्हावा यासाठी मैत्री २.० पोर्टलवर १४ विभागांच्या १२४ सेवा एकत्रित करून उपलब्ध करून दिलेल्या आहेत. यात एक खिडकी अर्ज प्रणाली (https:// maitri.maharashtra.gov.in), तक्रार समस्या निवारण , हेल्पलाईन मदत कक्ष (उरश्रश्र उशपींश) - क्रमांक १८०० २३३ २०३३, गुंतवणूकदारांचा मार्गदर्शक आणि प्रोत्साहन गणना यांसारख्या सेवांचा समावेश आहे.

वरील प्रमाणे सेवांचा लाभ आपल्या जिल्ह्यातील सर्व उद्यमी यांना व्हावा, ज्यामुळे जिल्ह्यातील उद्योगाची वाढ होण्यास मोठी मदत होईल आणि एकूणच जिल्ह्यांच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त उद्योजक व गुंतवणूकदारांनी वरील सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी केले आहे.

# राजापेठ झोनमध्ये प्लास्टिक जप्ती मोहिमेत ११ हजार रुपये दंड




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती,** महानगर पालिका स्वच्छता विभागाच्या वतीने प्लास्टिक वापरावर नियंत्रण आणण्यासाठी सातत्याने मोहिमा राबविण्यात येत असून त्याअंतर्गत आज मध्य झोन क्र. ०२ राजापेठ प्रभाग क्र. ०७, जवाहर स्टेडियम परिसरात बच्छराज प्लॉट भागात विशेष कारवाई करण्यात आली.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांचे आदेश तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव आणि सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर झोन क्र.२ यांच्या निर्देशानुसार ही मोहीम पार पडली. सदर कारवाईदरम्यान वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव यांच्या उपस्थितीत सारडा पॅकेजिंगच्या गोडाऊनवर छापा टाकण्यात आला.या छाप्यात २३५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्या, डिस्पोजल ग्लास व चमचे जप्त करण्यात आले. प्लास्टिकचा साठा केल्याबद्दल आस्थापनाधारकावर १०,००० रुपये दंड आकारण्यात आला. याशिवाय परिसरातील सर्व आस्थापनांना प्लास्टिक पिशव्या वापरू नये, ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवण्यासाठी दोन स्वतंत्र डस्टबिन वापरावे तसेच परिसर स्वच्छ ठेवावा अशा सक्त सूचना देण्यात आल्या.कारवाईदरम्यान दोन आस्थापनांकडे डस्टबिन नसल्यामुळे प्रत्येकी ५०० रुपये असे एकूण १,००० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. अशा प्रकारे आजच्या मोहिमेत एकूण ११,००० रुपये दंडाची वसुली करण्यात आली.या कारवाईत अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी श्री. जाधव, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, झोन क्र. २ चे जेष्ठ स्वच्छता निरीक्षक विजय भुरे, स्वच्छता निरीक्षक (प्लास्टिक मोहीम व हॉकर्स तपासणी) अनिकेत महल्ले, धनिराम कलोसे, शैलेश डोंगरे, रोहित हडाले, मनीष हडाले उपस्थित होते.महापालिकेच्या स्वच्छता विभागातर्फे नागरिकांना प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळण्याचे, ओला व सुका कचरा वेगळा ठेवून दोन डस्टबिनचा वापर करण्याचे आणि स्वच्छतेबाबत महापालिकेला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिक्षकांनी वेळेत अर्ज दाखल करावेत

## शिक्षक मतदारसंघाच्या मतदार याद्यांचा कार्यक्रम जाहीर

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती,**

अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदारयाद्या तयार करण्याचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. दिनांक १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नव्याने याद्या तयार करण्यात येणार आहे. सर्व पात्र शिक्षकांनी वेळेत अर्ज दाखल करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा सहायक मतदान नोंदणी अधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. मतदार नोंदणी कार्यक्रमामध्ये दि. ३० सप्टेंबर रोजी जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. दि. ६ नोव्हेंबरपर्यंत नमुना १९ द्वारे दावे स्वीकारण्यात येणार आहे. दि. २० नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार याद्यांची छपाई करण्यात येणार आहे. दि. २५ नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी केली जाईल. यावरील दावे व हरकती दि. २५ नोव्हेंबर २०२५ ते दि. १० डिसेंबर या कालावधीत स्वीकारण्यात येतील. दि. २५ डिसेंबर रोजी दावे व हरकती निकाली काढणे आणि पुरवणी यादी तयार करण्यात येणार आहे. दि. ३० डिसेंबर रोजी मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी करण्यात येणार आहे.लोकप्रतिनिधित्त्व अधिनियम १९५० च्या अधिनियम २७ (३) (ब) नुसार राज्य शासनाने निवडणूक आयोगाच्या मान्यतेने निश्चित केलेल्या माध्यमिक शाळेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये अर्हता दिनांकाच्या पूर्वीच्या लगतच्या ६ वर्षांमध्ये किमान ३ वर्ष पूर्णवेळ शिक्षक म्हणून कार्यरत असलेले शिक्षक मतदार म्हणून नोंदणीस पात्र आहेत. यासाठी पात्र शिक्षकांना सुधारीत नमुना क्रमांक १९ मध्ये आवश्यक रहिवासाचा पुरावा व प्रमाणपत्रांसह अर्ज सादर करता येईल. शिक्षक मतदारसंघासाठी मतदारयादी नव्याने तयार करण्यात येणार आहे. यासाठी पूर्वी नोंदणी केलेली असली तरी यावेळी नव्याने नोंदणी करावी लागणार आहे.

या नोंदणीसाठी अर्ज पदनिर्देशित अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयामध्ये सादर करता येतील. एकगठ्ठा अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, पात्र शैक्षणिक संस्थेचे प्रमुख त्यांच्या संस्थेतील सर्व पात्र कर्मचाऱ्यांचे अर्ज एकत्रित पाठवू शकतील. निवडणुकीसाठी मतदार नोंदणी अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यरत राहणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व तहसीलदार पदनिर्देशित अधिकारी राहणार आहेत. अमरावती विभाग शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी पात्र शिक्षकांनी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले आहे.


# सुधीर केने लिखित,राष्ट्रपतींनी गौरविलेले 'भूलाबाईची गाणी' पुस्तकाचे ४ ऑक्टोबरला प्रकाशन

## पुस्तकाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे शुभेच्छा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ अमरावती** वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विद्यालय मालखेड रेल्वे येथील माध्यमिक शिक्षक सुधीर पंजाबराव केने यांनी लिहिलेले व राष्ट्रपतींनी गौरविलेल्या भुलाबाईची गाणी या पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीचे प्रकाशन आमदार सौ सुलभाताई खोडके यांच्या हस्ते चार ऑक्टोबर रोजी होणार आहे.स्मृतिगंध व संगीत सूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक प्रतिष्ठान भारत गणराज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित' भूलाबाई उत्सव' जेसीआय हॉलमध्ये ४ ऑक्टोबर रोजी आयोजित केला आहे. याच कार्यक्रमात भुलाबाईची गाणी या पुस्तकाचे प्रकाशन केले जाणार आहे.भुलाबाईची गाणी या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचे तत्कालीन राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी गौरव पत्र देऊन अभिनंदन केले होते. सुधीर केने यांनी ' स्पर्धा परीक्षेसाठी माहितीचा अधिकार', ' बाप' हा चारोळी संग्रह आणि ' सर्वसामान्य नागरिकांसाठी माहितीचा अधिकार ' याही पुस्तकांचे लेखन केले आहे.कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने बाहुल्यापासून गानी म्हणण्याची परंपरा ही आपल्या लोक जीवनाशी आणि संस्कृतीशी घट्टपणे जोडलेली आहे .भुलाबाई सोबतच हातगा,भोंडल्याच्या रूपाने ही परंपरा राज्यभर जपली जाते या उत्सवाच्या गीत परंपरेतून हसत खेळत समाजातील ऐक्य ,बंधुभाव ,आनंद आणि लोक जीवनातील साधेपणा याचे दर्शन घडते. नव्या पिढीला या समृद्ध परंपरेची ओळख व्हावी म्हणून या पुस्तकाचे लेखन कौतुकास्पद आहे या शब्दात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी या पुस्तकाला शुभेच्छा संदेश दिले आहे.






# मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची निंभोरा फायर स्टेशन, नगरोत्थान रस्ते व सावता मैदान सांस्कृतिक भवन कामांची पाहणी

## विकासकामे वेळेत व दर्जेदार पूर्ण करा – आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी दिनांक २९ सप्टेंबर,२०२५ रोजी निंभोरा येथे सुरु असलेल्या फायर स्टेशनच्या बांधकाम स्थळाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. काम वेळेत व दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे, यासाठी आवश्यक त्या सूचना आयुक्त महोदयांनी दिल्या.त्यानंतर आयुक्त महोदयांनी नगरोत्थान योजनेतर्गत सुरू असलेल्या बारीपुरा ते गांधीनगर रेल्वे क्रॉसिंग जुनीवस्ती रोड तसेच होलीक्रॉस नवी वस्ती रोड येथील रस्त्यांची पाहणी केली. नागरिकांच्या सोयीसाठी रस्त्यांची गुणवत्ता उत्तम राखावी व काम नियोजनबद्ध गतीने पूर्ण करावे, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.याचप्रमाणे सावता मैदान येथे सुरु असलेल्या सांस्कृतिक भवनाच्या बांधकाम प्रकल्पालाही आयुक्तांनी भेट दिली. या ठिकाणी चालू असलेल्या कामकाजाची प्रगती पाहून बांधकाम अधिक मजबूत, सुरक्षित व गुणवत्तापूर्ण राहावे यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.आयुक्त महोदयांनी दिलेल्या निर्देशांमुळे संबंधित विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निंभोरा फायर स्टेशन, नगरोत्थान योजनेतील रस्ते व सावता मैदान सांस्कृतिक भवन या विविध विकासकामांची पाहणी करताना संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट व काटेकोर सूचना दिल्या. प्रत्येक काम वेळेत पूर्ण व्हावे यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करावी. सर्व विकासकामांची गुणवत्ता उत्तम राखावी व नागरिकांच्या सोयीला प्राधान्य द्यावे. फायर स्टेशनचे बांधकाम मजबूत, सुरक्षित व तांत्रिक दृष्टीने योग्य असावे. नगरोत्थान अंतर्गत सुरू असलेल्या रस्त्यांचे काम जलद गतीने व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे. सावता मैदान सांस्कृतिक भवन प्रकल्पात बांधकामाची गुणवत्ता व सुरक्षिततेवर विशेष भर द्यावा. कामामध्ये कोणतीही हलगर्जीपणा होऊ नये, नियमित तपासणी व आढावा घेतला जावा.आयुक्त महोदयांनी दिलेल्या या निर्देशांमुळे महत्त्वाच्या विकासकामांना गती मिळून नागरिकांना सुविधा वेळेत उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.या पाहणीदरम्यान महापालिकेचे संबंधित विभाग प्रमुख शहर अभियंता रविंद्र पवार, मुख्य अग्निशमन प्रमुख लक्ष्मण पावडे, अग्निशमन अधिक्षक संतोष केंद्रे, उपअभियंता श्रीरंग तायडे, अभियंता राजेश आगरकर, आर.आर. तांबेकर, सहाय्यक चेतन तांबेकर, अमीन नूर, मनपा कर्मचारी उपस्थित होते.-



# प्रसाद कॉलनीतील अपार्टमेंटमध्ये कुंटणखान्यावर छापा

## दोन महिला, चार तरुणी ताब्यात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती** अमरावती शहर गुन्हे शाखेच्या पथकाने फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील प्रसाद कॉलनी येथील सिद्धीश्री अपार्टमेंटमध्ये चालविण्यात येणाऱ्या कुंटणखान्यावर धाड टाकून दोन महिलांसह चार तरुणींना ताब्यात घेतले आहे. सदर कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

३० सप्टेंबर रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, गुन्हे शाखेने डमी ग्राहकाच्या माध्यमातून खात्री करून पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील दोन वेगवेगळ्या फ्लॅट्सवर छापा टाकला. यावेळी प्रथम मजल्यावरील फ्लॅटमधून एक महिला आणि दोन तरुणी, तसेच दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅटमधून दुसरी महिला आणि दोन तरुणी ताब्यात घेण्यात आल्या.प्राथमिक चौकशीत, या महिलांनी मागील वर्षभरापासून स्वतःच्या मालकीच्या फ्लॅट्समध्ये देहव्यापार चालविल्याचे उघड झाले आहे. तसेच, गुन्हे शाखेकडून संबंधित महिलांचे मोबाईल क्रमांक आणि ग्राहकांची माहिती गोळा करून पुढील तपास सुरू आहे.अमरावती पोलिसांकडून शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, अशा प्रकारच्या अवैध कुंटणखान्यांची माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांना कळवावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.सदर कारवाई पोलीस आयुक्त मा. श्री. अरविंद वावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ, शाम घूगे व सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि अमोल कडू, अंमलदार जहीर शेख, मनोज ठोसर, अतुल संभे, संग्राम भोजने, राहुल देंगेकार, राहुल दूधे व महिला अंमलदार वर्षा घोंगळे यांनी पार पाडली.

# मेहकरमध्ये समृद्धी महामार्गावर सर्वात मोठी कारवाई

## १.१३ कोटींचा गुटखा जप्त, अमरावतीचे ३ आरोपींना अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती–**
लोकार्पणापासून हिदूहदय सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी हतगती महामार्ग विविध कारणामुळे वादाचा आणि चर्चेचा विषय ठरला आहे. नियमित अंतराने होणारे अपघात, दरोडे, इंधन चोरी थाना त्या कारणाने हा मार्ग चर्चेत राहतो. आता यात गुटखा तस्करीची भर पडली आहे. मंगळवारी, ३० सप्टेंबर रोजी समृद्धी वर काही लाख नव्हे तर तब्बल १कोटी १३ लाख रुपयांचा गुटखा साठा जप्त करण्यात आला. यांचबरोबर मालवाहू वाहने जप्त करण्यात आली आहे. तसेच तिघा आरोपीना अटक करण्यात आली आहे. तिन्ही आरोपी अमरावती येथील रहिवासी असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. बुलढाणा जिल्ह्यातीलही आजवरची सर्वात मोठी कारवाई ठरली असून एवढा मोठा साठा पाहून पोलीस देखील चकरावून गेल्याचे वृत्त आहे.

पोलीस अधीक्षक नीलेश तांबे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हा शाखेने मेहकर पोलीस ठाणे हद्दीत समृद्धी महामार्गावर ही कारवाई केली, स्थानिक गुन्हे शाखेला मंगळवारी गोपनीय माहिती मिळाली होती, काही ईसम अशोक लेलँड कंपनीच्या ३ ट्रक मध्ये सुगंधीत पानमसाला व गुटखा माल बाळगून त्याची चोरटी वाहतूक करीत असल्याचे कळाले.

अमरावती कडून समृध्दी महामार्गाने मुंबईकडे ही वाहने जातं असल्याचे समजले जात आहे. माहितीवरून मेहकर ठाणे हद्दीत समृध्दी महामार्गावरील फर्दापूर टोलवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचला. यावेळी गुटखा व सुगंधीत पान मसाला भरलेले २ अशोक लेलैंड कंपनीचे ट्रक अडवून पाहणी केली असता त्यात हा साठा आढळून आला. या कारवाईमध्ये दोन ट्रक चालकांसह ३ इसमाना ताब्यात घेण्यात आले. आरोपी विरुध्द मेहकर पोलिसांनी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मेहकर पोलीस करीत आहेत.

मोहम्मद इम्रान मो. हफिज (वय २८ वर्षे, रा. विवाबानी मोहल्ला, अचलपूर जि. अमरावती.), अजीम बेग हाफिज बंग (वय ३६ वर्षे, रा. अन्सारनगर, अमरावती), एजाज अहेमद अजीज अहेमद (वय ३१ वर्षे, रा. शिरजगांव ता. चांदूरबाजार जि. अमरावती) अशी आरोपींची नावे आहे. या कारवाईत १.१३ कोटी रूपये किमतीचा २६४ पोत्यात भरलेला गुटखा जप्त करण्यात आला. तसेच तीस लाख रुपये किमतीचे २ अशोक लेलँड कंपनीचे ट्रक जप्त करण्यात आले. एकूण १ कोटी ४३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक नीलेश तांबे अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक प्रताप बाजड, अविनाश जायभाये, कर्मचारी शरद गिरी, दिपक लेकुरवाळे, पुरुषोत्तम आधाव, गणेश पुरुषोत्तम पाटील, नीलेश राजपूत, पूजा जाधव, समाधानटेकाळे, तांत्रिक विश्लेषण विभागाचे राजू आडवे, ऋऋषीकेश खंडेराव यांनी ही कारवाई केली.–

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त उद्या भोजनदान व आरोग्य शिबीर

## प्रज्ञा स्पर्श बहुउद्देशीय संस्थेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नांदगाव पेठ–** १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशोक विजयादशमीच्या पवित्र दिवशी लाखो अनुयायांना धम्मदीक्षा दिली. हा दिवस बौद्ध अनुयायांसाठी श्रद्धा, प्रेरणा आणि आत्मसन्मानाचा दिवस असून दरवर्षी देशभरातील अनुयायी नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमीवर नतमस्तक होण्यासाठी जातात.या अनुयायांच्या सेवेसाठी प्रज्ञा स्पर्श बहुउद्देशीय संस्था, नांदगाव पेठ यांच्या वतीने २ ऑक्टोबर रोजी टोल नाका, नांदगाव पेठ येथे भोजनदान व आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

दीक्षाभूमीकडे प्रस्थान करणाऱ्या अनुयायांना भोजन व आरोग्य तपासणीची सुविधा या उपक्रमातून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.सलग चौदा वर्षांपासून प्रज्ञा स्पर्श बहुउद्देशीय संस्था अनुयायांसाठी निस्वार्थ भावनेने हा उपक्रम राबवत असते.नांदगाव पेठ मधील अनुयायी तसेच प्रज्ञा स्पर्श बहुउद्देशीय संस्था नित्यनेमाने हा उपक्रम राबवत असून दरवर्षी हजारो अनुयायी या उपक्रमाचा अवश्य लाभ घेतात. या उपक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने सुमित कांबळे, मंगेश तायडे, कैलास मोरे, अर्जुन युवनाते, मनोज गडलिंग, धीरज गवई, सचिन कांबळे, अंकुश बनसोड, शंकर बसले, दिनेश खडसे व मनीष गूळदे यांनी केले आहे.

# शिक्षक विधानपरिषद मतदार संघाच्या निवडणुकीसंदर्भात राजकीय पक्ष आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशी बैठक संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती,** भारत निवडणूक आयोगाने दि. १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याच्या कार्यक्रम घोषित केला आहे. यासंदर्भात अमरावती विभागातील राजकीय पक्षांना माहिती देण्यासाठी मतदार नोंदणी अधिकारी, शिक्षक मतदार संघ तथा विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात आज झाली.

यावेळी अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) रविंद्र हजारे, तहसीलदार प्रज्ञा काकडे तसेच मिलींद चिमोटे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), संतोष महात्मे (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजीत पवार गट), हेमंत देशमुख (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शरद पवार गट), दिनेश सुर्यवंशी (भारतीय जनता पक्ष) यांच्यासह अन्य राजकीय पक्षाचे पदाधिकारी, प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते.

अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदार संघाच्या दि. १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यासंबंधीची जाहीर सूचना परिशिष्ट ब व पहिली अनुसूची दि. ३० सप्टेंबर रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. शिक्षक मतदारसंघासाठीच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्याबाबत कार्यक्रम व वेळापत्रकाची माहिती विभागीय आयुक्तांनी यावेळी बैठकीत दिली.



**पुनरीक्षण कार्यक्रमाचे टप्पे–** मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१(३) अन्वये जाहीर सूचना दि.३० सप्टेंबर प्रसिद्ध करण्यात आली. मतदार नोंदणी अधिनियमानुसार वर्तमान पत्रातील सूचनेची प्रथम पुनर्प्रसिध्दी दि.१५ ऑक्टोबर रोजी होईल. वर्तमानपत्रातील नोटीसीची व्दितीय पुनर्प्रसिध्दी दि.२५ ऑक्टोबर रोजी होईल. नमूना–१९ व्दारे अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ६ नोव्हेंबर आहे. हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई दि.२० नोव्हेंबर रोजी होईल. प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी दि.२५ नोव्हेंबर होईल. दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी दि.२५ नोव्हेंबर ते दि. १० डिसेंबर असा आहे. दावे व हरकती निकाली काढणे व पुरवणी यादी तयार करणे, छपाई करणे यासाठी दि.२५ डिसेंबर हा दिवस निश्चित आहे.

मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी दि.३० डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे, अशी माहिती विभागीय आयुक्तांनी यावेळी दिली.मतदार पात्रतेचे निकष तसेच अनुषंगीक अटी व शर्ती याबाबत विभागीय आयुक्तांनी यावेळी उपस्थितांना माहिती दिली. त्या म्हणाल्या की, नमूना क्रमांक–१९ मधील एकगठ्ठा अर्ज, मग ते व्यक्तिशः दाखल केलेले असोत अथवा पोस्टाने पाठविलेले असोत, मतदार नोंदणीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तथापि, पात्र शैक्षणिक संस्थेचे प्रमुख हे त्यांच्या संस्थेतील सर्व पात्र कर्मचाऱ्यांचे अर्ज एकत्रित पाठवू शकतील. राजकीय पक्ष, मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी, रेसिडेन्ट वेलफेअर असोसिएशन यांना एकगठ्ठा अर्ज करता येणार नाहीत, असेही डॉ. सिंघल यांनी यावेळी सांगितले.

शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसंदर्भात शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशी बैठक

भारत निवडणूक आयोगाने दि. १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याच्या कार्यक्रम घोषित केला आहे.

याअनुषंगाने आवश्यक कार्यवाही व नियोजनासाठी मतदार नोंदणी अधिकारी, शिक्षक मतदारसंघ तथा विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली. शिक्षक मतदारसंघासाठीच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्याबाबतचा कार्यक्रम व वेळापत्रक, मतदार नोंदणी पात्रतेचे निकष, एक गठ्ठा अर्ज आदी महत्वाच्या विषयासंदर्भात विभागीय आयुक्तांनी बैठकीत माहिती दिली. शिक्षण क्षेत्रातील सर्व संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी बैठकीला उपस्थित होते.–

### नमुना १९ ऑनलाईन उपलब्ध

मतदार नोंदणी कार्यक्रमासाठी अमरावती विभागीय आयुक्त हे मतदार नोंदणी अधिकारी असून त्या त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील सर्व उप विभागीय अधिकारी हे सहायक मतदार नोंदणी अधिकारी असून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे तहसीलदार हे पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांच्या कार्यालयामध्ये नमूना–१९ मधील अर्ज दि. ६ नोव्हेंबरपर्यत सादर करता येतील. नमूना–१९ मधील अर्ज मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर ( https://ceoelection.maharashtra. gov.in/ceo/Graduates-and-Teachers-Constituencies-2025.aspx ), त्याचप्रमाणे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या व विभागातील पाचही जिल्ह्यांच्या जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर नमूना–१९ मधील ऑनलाईन अर्ज उपलब्ध आहेत, अशी माहिती विभागीय आयुक्तांनी यावेळी दिली.

# धानोरा (मोगल) गावकऱ्यांचा आक्रोश, अवैध दारू व जुगार तात्काळ बंद करा!

## ग्रामपंचायत व महिला ग्रामस्थांची नांदगाव खंडेश्वर ठाणेदारांकडे धाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१चांदूर रेल्वे –**
आमच्या गावात विष ओतलं जातंय, संसार उद्धवस्त होतायत, युवक बरबाद होतायत, आणि पोलीस मात्र डोळेझाक करतायत! – अशा शब्दांत चांदूर रेल्वे तालुक्यातील व नांदगाव खंडेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत येर्णाऱ्या धानोरा (मोगल) गावकऱ्यांनी पोलीस प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी मिळून नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांना निवेदन देत गावातील अवैध दारू व जुगाराचे अड्डे तात्काळ बंद करण्याची मागणी केली. विशेष म्हणजे गेल्या काही महिन्यांपासून सतत तक्रारी करून, दारूबंदीचा ठराव करूनही पोलिसांकडून कारवाई होत नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

नुकत्याच ठाणेदारांनी गावाला दिलेल्या भेटीतही नागरिकांनी थेट नाराजी व्यक्त करत गाव उद्धवस्त होतंय, पण पोलीस मौन बाळगत आहेत! असा सवाल केला. त्यानंतर पुन्हा एकदा ठोस कारवाईसाठी निवेदन देण्यात आले. यावेळी सरपंच अमोल लहाबर, उपसरपंच शितल काळमेघ, सदस्य रविंद्र वानखडे, सागर झाकर्डे, प्रिया गुल्हाने, प्रियंका चौधरी, मिना ठाकरे यांसह महिला गावकरी संजीवनी नागोसे, पूजा काळसर्पे, तारा सोनवणे, सुनीता सोळंके, कुसुम चौधरी, रंजना नेवारे, मंगला शेंडे, प्रतिभा कोळमकर, माया वानखडे, उषा मारबदे, मीना मारबदे, विमल सोनोने, सुवर्णा राठोड, रजनी शेंडे, सुशीला शेंडे, कोकीळा इंगळे, आरती शेंडे व इतर मोठ्या संख्येने जमले होते. गावातील महिला, वृद्ध व युवक सर्वांनी एकमुखाने आवाज उठवत आमच्या गावाला दारूमुक्त करा! अशी आर्त मागणी केली. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, पोलिसांनी आता तरी गांभीर्याने लक्ष घालून अवैध धंदे बंद केले नाहीत, तर लवकरच तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल असे म्हणाले.



# बोगस पॅथॉलॉजी लॅबला दणका कधी?

## अंजनगाव शहरात विनापरवाना धारकांचा सुळसुळाट

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१ अंजनगाव सुर्जी–**
रूग्णांना स्वस्त औषधे उपलब्ध व्हावीतम्हणून जेनेरिक औषधे लिहून देणेही डॉक्टरांना बंधनकारक केले आहे. मात्र त्याचवेळी आजाराचे निदान करणार्या पॅथॉलॉजी लॅबकडे केंद्र आणि राज्य सरकार दोघांचेही दुर्लक्ष होत आहे.पॅथॉलॉजी क्षेत्रावर सरकारी नियंत्रण नसल्याने बोगस पॅथॉलॉजी लॅब आणि पॅथॉलॉजिस्टचा अंजनगाव शहरात सुळसुळाट झाला आहे. हे बोगस पॅथॉलॉजिस्ट आणि लॅबचालक रूग्णांची आर्थिक लूट करत आहेत. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारने या क्षेत्रातील फसवणुकीकडे गांभीर्याने लक्ष देत ठोस धोरण आखून हे क्षेत्र नियंत्रित करावे, अशी मागणी आता सामान्य नागरिकांकडून होत आहे.औषध खरेदी–विक्री, उत्पादनाकरीता डॉक्टरांसाठी नोंदणी–परवाना बंधनकारक असून या नोंदणीची जबाबदारी निश्चित यंत्रणांवर टाकण्यात आली आहे. त्याचवेळी पॅथॉलॉजी लॅबसाठी नोंदणी हा प्रकारच नाही. त्यामुळे कुणीही, कुठेही या पॅथॉलॉजी लॅब थाटत रूग्णांची आर्थिक लूट करत आहेत.महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट अ‍ॅण्ड मायक्रोबायोलॉजिस्ट' ही संघटना गेल्या कित्येक वर्षांपासून बोगस लॅब आणि बोगस पॅथालॉजिस्टला आळा घालण्याची मागणी करत राज्य सरकारसह केंद्र सरकारकडे पाठपुरावा करत आहे. मात्र सरकार याकडे कानाडोळा करत असल्याने बोगस पॅथॉलॉजिस्टचे फावत असल्याचा आरोप आता सामान्य नागरिकांकडून होत आहे.नोंदणी नसल्याने या पॅथॉलॉजी लॅबविरोधात कारवाई कुणी करायची? यावरही मतमतांतरे आहेत. अन्न आणि औषध प्रशासन, नगपालिका की आरोग्य विभाग यापैकी कुणी या लॅबवर कारवाई करायची यासंबंधीचा कुठलाही कायदा नसल्याने सर्वत्र सावळागोंधळ माजला आहे.पॅथॉलॉजी लॅब चालवण्याचे अधिकार कुणाला आहेत? यासह अन्य बाबींचा अभ्यास करण्यासाठी सरकारने एक समिति स्थापन केली होती. या समितीचे पुढे काय झाले असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित होत आहे.. केंद्र सरकार आरोग्य क्षेत्राकडे लक्ष देत असताना याच क्षेत्रातील पॅथॉलॉजी लॅब घटकाकडेही आता केंद्रासह राज्याने लक्ष देत रुग्णांची फसवणूक करणार्यांना दणका द्यावा, अशी आशा सामान्य नागरिकांकडून होत आहे.



अंजनगाव शहरात आमच्या संघटनेत पॅथॉलॉजी, क्लिनिकल लॅबरोटरी परवानाधारक आहेत तरी कोणा बाबत स्वंशय असल्यास चौकशीत निष्पन्न होईल **दिनेश धांडे**अध्यक्ष पॅथॉलॉजी क्लिनिकल, लॅबरोटरी संघटना

### पदवीची चौकशी होणे आवश्यक

महाराष्ट्र पॅरा वैद्यकीय परिषद मध्ये समाविष्ट नसलेल्या मान्यताप्राप्त मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी पदवी, पदविका नसताना अनेक जण अंजनगाव शहरात पॅथॉलॉजी क्लिनिकल,लॅबरोटरी चे व्यवसाय करत शहरात अवास्तव शुल्क आकारुन रुग्णांना त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने पॅथॉलॉजी क्लिनिकल, लॅबरोटरी धारकांच्या पदवीची चौकशी होणे गरजेचे आहे तर बहुतांश परवानाधारक हे दोन दोन शहरात आपला व्यवसाय थाटून रुग्णांच्या जिवाशी खेळ खेळत असल्याने याबाबत चौकशी होणे गरजेचे आहे

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विशेष रेल्वेगाड्या

## अमरावतीसह बडनेरावासीयांना दिलासा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

धम्मचक्र प्रवर्तन दिन हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ मध्ये अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारल्याचा ऐतिहासिक दिवस आहे. या दिवशी त्यांचे अनुयायी अभिवादन करतात. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वे २० विशेष फेऱ्या करणार आहे.

नागपूर–अकोला विशेष रेल्वे क्र. ०११३२ ही २ ऑक्टोबरला नागपुरातून ६.४० वाजता सुटेल आणि अकोला येथे त्याच दिवशी ११.३० वाजता पोहोचेल. तसेच ०११३१ ही विशेष गाडी ३ रोजी अकोला येथून रात्री १२.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी पहाटे ४.५० वाजता पोहोचेल. सीएसएमटी–नागपूर अनारक्षित विशेष गाडी क्र. ०१०१९ ही १ ऑक्टोबरला मुंबईतून दु.२.३० वाजता सुटेल आणि नागपूरला दुसऱ्या दिवशी सकाळी ६.१० वाजता पोहोचेल. गाडी क्र. ०१०२० ही २ रोजी नागपूरहून रात्री १०.३० वाजता सुटेल आणि सीएसएमटीला दुसऱ्या दिवशी ५.२० वाजता पोहोचेल.

पुणे– नागपूर अनारक्षित गाडी क्र.०१२१५ ही १ ऑक्टोबरला पुणे येथून २.५० वाजता सुटेल आणि नागपूरला दुसऱ्या दिवशी स. ७.३० वाजता पोहोचेल. ०१२१६ ही २ रोजी नागपूर येथून रात्री ११ वाजता सुटेल आणि पुण्यात दुसऱ्या दिवशी ४.२० वाजता पोहोचेल. सोलापूर– नागपूर गाडी क्र. ०१०२९ ही १ रोजी सोलापूर येथून स.९.५० वाजता सुटेल आणि नागपूरला दुसऱ्या दिवशी पहाटे ५.१० वाजता पोहोचेल. गाडी क्र. ०१०३० अनारक्षित विशेष रेल्वे २ ऑक्टोबरला नागपूरहून रात्री ११.३० वाजता सुटेल आणि सोलापूरला दुसऱ्या दिवशी रात्री ११.४५ वाजता पोहोचेल.

नागपूर–भुसावळ अनारक्षित विशेष गाडी ६ फेऱ्या करणार असून ०१२१४ ही १,२ व ३ ऑक्टो.रोजी नागपूर येथून रात्री ९.३० वाजता सुटेल आणि भुसावळ येथे पुढील दिवशी पहाटे ४ वाजता पोहोचेल. तसेच गाडी क्र. १२११३ ही २,३ व ४ रोजी भुसावळ येथून पहाटे ५ वाजता सुटेल आणि नागपूरला १२.२० वाजता पोहोचेल. नाशिक रोड– नागपूर मेमू २ फेऱ्या करणार असून गाडी क्र. ०१२३१ ही १ ऑक्टोबरला नाशिक रोड येथून ६ वाजता सुटेल आणि नागपूरला दुसऱ्या दिवशी स.८ वाजता पोहोचेल. तसेच गाडी क्र. ०१२३२ अनारक्षित मेमू २ रोजी नागपूरहून दु. ४.२० वाजता सुटेल आणि नाशिक रोड येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ३.४५ वाजता पोहोचेल. नाशिक रोड– नागपूर मेमू क्र. ०१२३३ ३ व ४ रोजी नाशिक रोड येथून पहाटे ४.१५ वाजता सुटेल आणि नागपूरला दु.३.४० वाजता पोहोचेल. गाडी क्र. ०१२३४ ही ३ व ४ रोजी नागपूरहून दु. ४.२० वाजता सुटेल आणि नाशिक रोड येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ३.४५ वाजता पोहोचेल.

# अमरावती शहर पोलीस आयुक्तालयात ५२ गुन्ह्यात जप्त १.९० कोटींचा जप्त गांजा, एमडी मुद्देमाल नष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**



शहर पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस स्टेशनला एन.डी.पी.एस ॲक्ट १९०६ अंतर्गत दाखल ४७ गुन्सतील जप्त ८९६.८१७ किलोग्राम गांजा किंमत १,७९,३६,३४० (एक कोटी एकोण अंशी लाख, छत्तीस हजार तीनशे चाळीस रुपये) जप्त केला होता. तसेच ०५ गुन्ह्यातील २१५ ग्रॅम एम डी अंमली पदार्थ किंमत १०,७५,२५० ( दहा लाख, पंच्च्याहत्तर हजार, दोनशे पन्नास, रूपये) जप्त केलीहोती. दोन्ही मिळून ५२ गुन्ह्यातील अंमली पदार्थ मुद्येमाल एकूण १,९०,११,५९० (एक कोटी, नव्वद लाख, अकरा हजार, पाचशे नव्वद, रूपये) रूपयांचा जप्त मुद्देमाल सोमवारला केंद्रीय गोडावून पोलिस आयुक्त कार्यालय अमरावती येथून महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेड,बुटीबोरीएमआयडीसी. जि. नागपुर येथे इन्सिनेटरच्या मदतीने जाळून नष्ट करण्यात आला.यामध्ये अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील सन १९९६ पासून दाखल असलेल्या १) पोलीस ठाणे नागपुरी गेट येथील २६ केसेस, २) पोलीस ठाणे बडनेरा येथील ८ केसेस, ३) पोलीस ठाणे गाडगेनगर येथील ११ केसेस ४) पोलीस ठाणे खोलापुरी गेट येथील ३ केसेस ५) पोलीस ठाणे नांदगाव पेठ येथील २ केसेस ६) पोलीस ठाणे फेजरपुरा येथील १ केसेस ७) पोलीस ठाणे वलगाव येथील १ केसेस याप्रमाणे एकूण ५२ प्रकरणाचा समावेश होता.

या सर्व प्रकरणांचा न्यायालयीन निकाल लागलेला असल्याने गांजा व एमडी मुद्देमाल नाश करण्याकरीता पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या आदेशाने रमेश धुमाळ, पोलीस उपायुक्त (मुख्यालय), तसेच शाम घुगे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र २ अशी त्रिसदस्यीय ड्रग डीस्पोजल कमीटी स्थापन करण्यात आली होती. सदर ड्रग डीस्पोजल कमीटीच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांचेकडून गांजा व एमडी मुद्देमाल नाश करण्याकरीता परवानगी प्राप्त करण्यात आली.त्यांनी महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेड, बुटीबोरी एमआयडीसी, जि. नागपुर या ठिकाणी सदर गांजा व एमडी मुद्दे माल नाश करण्याची परवानगी दिली होती. त्याप्रमाणे २९ सप्टेंबर २०२५ रोजी सदर संपुर्ण ५२ प्रकरणामधील गांजा व एमडी मुद्देमाल वरील ठिकाणी ड्रग्स डीस्पोजल कमीटी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, महाराष्ट्र एनवायरो पावर लिमीटेड चे मॅनेजर, दोन पंच व आणि पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांचे समक्ष कंपनीमध्ये इंसीनेटरच्या मदतीने जाळून नष्ट करण्यात आला.सदर कार्यवाही अरविद चावरिया, पोलीस आयुक्त अमरावती शहर यांच्या आदेशाने रमेश धुमाळ, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) तसेचशामघुगे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र.२. शिवाजी बचाटे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा अमरावती शहर येथील श्रीमती सिमा दाताळकर पोलीस निरीक्षक, योगेश इंगळे सहायक पोलीस निरीक्षक, स.पो.उपनि, कैलास सानप, पो.हे.कॉ. अजय मिश्रा, सुधीर गुडधे, सभांजी केद्रे, चालक नितीन लांडगे, यांनी केली.

# महावितरणच्या सौदामिनींची आंतरराष्ट्रीय पातळीवरही झळाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**



जिल्ह्यात विविध पदावर कार्यरत महावितरणच्या काही सौदामिनींनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले कार्य कर्तृत्व सिध्द केले आहे, तर काहींनी विशेष काम करून स्वत: सोबत महावितरणचाही लौकीक वाढविला आहे. महावितरणसाठी ही अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले.

नवरात्र उत्सवानिमित्त आयोजित 'सन्मान सौदामिनिंचा' कार्यक्रमानिमित्त विद्युत भवनात महिला कर्मचाऱ्यांचा कर्तृत्वाचा सन्मान करण्यात आला. यावेळी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, दीपाली माडेलवार, सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, कार्यकारी अभियंता प्रदिप पुनसे, राजेश माहुलकर, प्रणाली विश्लेषक नितीन नांदुरकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे यांच्यासह परिमंडळ कार्यालयात कार्यरत महावितरणच्या महिला कर्मचारी उपस्थित होत्या.

नेपाळमध्ये पंच म्हणून बजावली कामगिरी २००२ पासून एरोबिक्स खेळायला सुरूवात केली, नंतर २००८ मध्ये स्वयंमसिध्दा मास्टर ट्रेनिंगसाठी निवड झाली, प्रत्येक टप्प्यावर सिध्द केल्याने २०११ मध्ये एरोबिक्सच्या अखिल भारतीय राष्ट्रीय चँपियनशीपचे प्रशिक्षक म्हणूनही निवड, तसेच २०२३ मध्ये नेपाळ येथे झालेल्या एशियन एरोबिक्स चँपियनशीपसाठी त्यांची भारताकडून पंच म्हणूनही निवड झाली होती,

अग्निहोत्री ह्या महाराष्ट्र एरोबिक्स असोशिएशनच्या उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असून महावितरणसोबत हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाची मोलाची साथ मिळाली असल्याचे कनिष्ठ लिपीक वैशाली अग्निहोत्री यांनी सांगीतले.

महावितरणच्या दागिनींच्या कामगिरीःमोलाची उपकार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असलेल्या रूपा भारती म्हणाल्या की, नुकतेच महावितरण ९३ गुण मिळवून देशातील अव्वल कंपनी ठरली आणि यात महावितरणच्या दामिनीची मोलाची कामगीरी आहे. हे प्रशासनाने दामिनीच्या सन्मानातून दाखवून दिले. ही महावितरणच्या महिला कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणा देणारी बाब आहे. महावितरणच्या तांत्रिक महिला कर्मचारी रात्री –बेरात्री धोका पत्करून काम करतात. यामागे खरी प्रेरणा ही वरिष्ठांची आहे.असेही उपकार्यकारी अभियंता रुपा भारती म्हणाल्या.

'सर्वोत्कृष्ट विदर्भ महिला' सन्मान सहाय्यक विधी अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या आद्यश्री कांबे यांच्या विधीक्षेत्रातील योगदानाची, समर्पणाची दखल घेत नुकताच त्यांना सर्वोत्कृष्ठ विदर्भ महिला २०२५ ने सन्मानित करण्यात आले आहे. विधी विभागाचे काम करतांना महावितरणच्या सर्वच विभागाशी संबंध येत असून वेगळे काम करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे सहाय्यक विधी अधिकारी आद्यश्री कांबे यांनी सांगीतले.

# पाण्याअभावी परतवाड्याची तगमग जिओच्या कामामुळे पाईपलाईन खंडित

## ब्राह्मणसभेसह अन्य परिसरात पाण्यासाठी हाहाकार: नागरिकांमध्ये रोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अचलपूर**

जिओ कंपनीच्या मनमानी कारभारामुळे परतवाडा शहरात कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाली आहे. ऐन उत्सवाच्या दिवसात घरात पाणी नसल्यामुळे प्रामुख्याने महिला वर्गापुढे गंभीर संकट निर्माण झाले आहे. जिओ कंपनीचे केबल टाकण्याचे काम करण्यासाठी जुळ्या शहरात ठिकठिकाणी खड्डे खोदले जात आहे. त्याच जागेवरून नगरपालिकेची पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन टाकण्यात आली आहे. केबलसाठी खड्डे खोदताना नेमका पाईपलाईन वर घाव घातला जात आहे. मागच्या आठवड्यात आठवडी बाजाराजवळ जिओच्या कामगारांनी पाईपलाईन फोडली होती. त्यामुळे काही परिसरात दोन दिवस नागरिकांना पाण्यासाठी कामकाजावर भटकंती करावी लागली होती. नगरपालिकेच्या नागरिकांनी सडकुन टीका केली होती. पाइपलाइन दुरुस्त झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी नागरिकांना पाणी मिळाले. आपण संबंधितांना पत्र देऊ असे त्यावेळी धीरजकुमार गोहाड यांनी म्हटले होते.

सदर घटनेची शाई वाळते न वाळते तोच पुन्हा सदर कर्मचाऱ्यांनी वाघामाता परिसरात केबल टाकताना दुसऱ्यांदा पाईप फोडली. त्यामुळे शहरवासीयांना रविवार आणि सोमवारी पाणी मिळाले नाही. मंगळवारीसुद्धा पाणी कमीच पुरविण्यात आले. शहरातील ९० टक्के पेक्षा जास्त नागरीक नगर परिषदेच्या पाणीपुरवठा योजनेवर अवलंबूनआहे. याशिवाय शहरात पाण्याचे दुसरे स्त्रोत नाही. अशाप्रकारे चुकीच्या पद्धतीने पाईप लाईन फोडण्याची कामे करून शहरवासीयांना पाण्यापासून वंचित ठेवले जात असल्याने नागरिकांमध्ये रोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. यासंदर्भात नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धीरज गोहाड यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, जिओ कंपनीला राज्य सरकारची परवानगी आहे. परवानगी आहे तर त्यांनी पाईपलाईन फोडावी का, त्यांना पाईपलाईन नगरपालिकेकडून बाबात पाणीपुरवठा विभागाचे मार्गदर्शन का होत नाही, त्यांनी एवढा मोठा गुन्हा केला असल्याने त्यांचेवर एफ आय आर का दाखल केला नाही, प्रस्तुत प्रतिनिधीने विचारलेल्या या प्रश्नांवर ते म्हणाले, दिवाळीपर्यंत त्यांचे काम थांबवण्यात आले आहे.

> पाईपलाईन फोडल्यानंतर निर्माण झालेल्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नगरपालिकेकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला नाही. हापसी करून ठेवली पण ती बंद आहे. पिण्यासाठी पाणी कुठून कुठून आणावे हा गंभीर प्रश्न आहे. नळाला पाणी नियमित येत नाही. असंतुलित पाणीपुरवठा सुरू आहे. आमचे म्हणणे ऐकून घ्यायलाही कुणी तयार नाही. अधिकारी निडर झाल्यासारखे वागत आहे.
>
> **प्रदीप ठाकूर, ब्राह्मणसभा कॉलनी परतवाडा.**

# अमरावती जि.प.ला एकाच दिवशी दोन नवे अधिकारी

## विनय ठमके अतिरिक्त सीईओ, श्रीराम कुळकर्णी जीएडीचा पदभार घेणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**




अमरावती जिल्हा परिषदेला एकाच दिवशी दोन नवे अधिकारी मिळाले आहेत. राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने महाराष्ट्र विकास सेवा संवर्गातील गट 'अ' मधील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून, यामध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी या दोन्ही पदांवर नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे दोन्ही अधिकारी लवकरच आपला पदभार स्वीकारतील.

अकोला येथील विनय ठमके यांची अमरावती जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संतोष जोशी यांची कोल्हापूर येथे बदली झाल्यापासून हे पद रिक्त होते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प अधिकारी प्रीती देशमुख यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. ठमके त्यांच्याकडूनच नवी जबाबदारी स्वीकारतील.सामान्य प्रशासन (जीएडी) विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून डॉ. श्रीराम कुळकर्णी यांची नियुक्ती झाली आहे. यु. आर. म्हेत्रे यांच्या बदलीने हे पद रिक्त झाले होते. डॉ. कुळकर्णी सध्या आयुक्त कार्यालयात मग्रारोहयोचे अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांनी यापूर्वी जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता मिशनचे प्रमुख म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. विशेष म्हणजे, या दोन्ही अधिकाऱ्यांनी यापूर्वीही अमरावती जिल्हा परिषदेत काम केले आहे.

या दोन अनुभवी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्रा यांच्या चमूत मनुष्यबळाची वाढ झाली आहे. यामुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजाला गती मिळेल आणि अनेक नवीन बदल दिसून येतील अशी अपेक्षा आहे.

# रस्ता दुरुस्तीच्या मागणीसाठी चक्काजाम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१धामणगाव रेल्वे**

धामणगाव रेल्वे तालुक्यातील परसोडी, हिंगणगाव व कासारखेड, निंबोली येथील नागरिकांनी रस्त्याच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी धामणगांव रेल्वेतील वीर महाराणा प्रताप चौक येथे मोठ्या प्रमाणावर चक्काजाम आंदोलन केले. या आंदोलनात हजारो नागरिक, महिला व विद्यार्थी सहभागी झाले होते.सरपंच दुर्गाबक्ष ठाकूर व उपसरपंच संगीता धोटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन राबविण्यात आले. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिकांना दैनंदिन प्रवासात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून, विद्यार्थ्यांना शाळा–महाविद्यालयात ये–जा करताना धोका निर्माण होत आहे. आंदोलनादरम्यान विद्यार्थी प्रत्यक्ष खड्ड्यांमध्ये उभे राहून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.आंदोलनामुळे वीर महाराणा प्रताप चौकात चक्काजाम झाल्याने वाहतुकीची मोठी कोंडी झाली. यावेळी दत्तापूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन चौकात बंदोबस्त ठेवला. नागरिकांची वाढती गर्दी व संताप पाहता वातावरण तणावपूर्ण झाले होते.या आंदोलनाची दखल घेत बांधकाम विभागाच्या अधिकार्यांनी घटनास्थळी येऊन नागरिकांना रस्ता लवकरच दुरुस्त करण्यात येईल असे आश्वासन दिले. तसेच आमदार प्रताप अडसड यांनीही संदेशाद्वारे नागरिकांना रस्ता लवकरच दुरुस्त होणार असल्याचे आश्वासन दिले.अधिकार्यांच्या व आमदारांच्या आश्वासनानंतर नागरिकांनी समाधान व्यक्त करत चक्काजाम आंदोलनाची सांगता केली. तरीही रस्त्याची दुरुस्ती लवकरात लवकर न झाल्यास पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# एजुस्किल कनेक्ट २०२५ मध्ये प्रा.राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चचे यश : सात राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अमरावती प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च बडनेरा यांनी शिमला येथे झालेल्या एजुस्किल कनेक्ट २०२५ राष्ट्रीय परिषदेत तब्बल सात प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार जिंकत विदर्भाची मान उंचावली आहे.

या तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी हिमाचल प्रदेशाचे राज्यपाल प्रताप शुक्ला, ख्यातनाम अभिनेते आशिष विद्यार्थी, तसेच अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शैक्षणिक उत्कृष्टता, उद्योगसंबंध आणि नाविन्यपूर्ण कौशल्य विकासात केलेल्या सातत्यपूर्ण कामगिरीची ही भव्य दखल असल्याचे आयोजकांनी सांगितले. या सात पुरस्कारामध्ये बेस्ट परफॉर्मिंग इंजिनिअरिंग कॉलेज २०२५, बेस्ट परफॉर्मिंग इंजिनिअरिंग कॉलेज–वेस्ट झोन, ज्युनिपर व्हर्चुअल इंटर्नशिप्स मध्ये बेस्ट परफॉर्मिंग इंजिनिअरिंग कॉलेज तथा आरटीफिशिअल इंटेलिजेंस मध्ये विशेष कार्यासाठी पुरस्कारमुख्य आहेत.या व्यतिरिक्त प्राचार्य उत्कृष्टता पुरस्काराणे प्राचार्य डॉ. गजेन्द्र बामनोटे यांना प्रो. के. के. अग्रवाल (व्हाइस चांसलर, सार्क युनिव्हर्सिटी व माजी अध्यक्ष, एन. बी. ए.) यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच ट्रेनिंग व प्लेसमेंट उत्कृष्टता पुरस्कार–डॉ. निक्कू खालसा, डीन टी अँड पी यांना राज्यसभा संयुक्त सचिव व एआयसीटीई सल्लागार राघव दास यांच्या हस्ते तर बेस्ट परफॉर्मिंग सीईओई पुरस्कार –डॉ. आनंद चौधरी, प्लेसमेंट ऑफिसर यांना डॉ शुभजीत जागदेव यांच्या हस्ते देण्यात आला. या अभूतपूर्व यशा बद्दल अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी तसेच कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे यांनी प्राचार्य, ट्रेनिंग व प्लेसमेंट विभाग, सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# झेंडूच्या फुलांना मिळाला बाजारात ७० रुपये किलोचा भाव; गतवर्षीपेक्षा दहा रुपयांनी भाव कमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

घर,दुकान,ऑफिसला तोरण बांधण्यासाठी आवश्यक असलेली झेंडूची फुले विजयादशमीच्या पूर्वसंध्येलाच शहरात विविध ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध झाली. पिवळी, गुलाबी व लाल रंगाची ही फुले बाजारात ७० रुपये प्रती किलो दराने विक्री केली जात होती. मात्र गतवर्षीपेक्षा फुलांना किंमत कमी मिळत होती.जिल्ह्यात सर्वच भागात फुलबागेची लागवड केली जाते.



त्यात झेंडूच्या फुलांची लागवड हजारो हेक्टरवर करण्यात आली. यंदा पर्जन्यमान चांगले असल्याने झेंडूच्या फुलांचा बहर चांगलाच आला आहे. गणेशोत्सवापासूनच झेंडूची फुले विक्रीस आली असली तरी या फुलांची विक्री दसरा व दिवाळीला मोठ्या प्रमाणात होत असल्याने अमरावती शहरातील राजकमल चौक, जयस्तंभ चौक, राजापेठ चौकासह इतर काही महत्त्वाची ठिकाणे व्यापाऱ्यांनी फुले विक्रीसाठी निवडली आहेत यंदा पावसाने अधिक प्रमाणात हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असले तरी झेंडूच्या फुलांचा मुबलक साठा अमरावती शहरात विक्रीस उपलब्ध झाला आहे .

**पावसामुळे झेंडूच्या फुलांना फटका**

झेंडूच्या फुलांना दसरा सणाला महत्त्व आहे. शेतकरी नियोजन करून झेंडूची लागवड करतात. धामणगाव येथील शेतशिवारात झेंडूच्या फुलांची शेती बहरत आहेत. परंतु मध्यंतरी पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे या परिसरातील झेंडू फुलांना फटका बसला त्यातच पावसामुळे काही भागात झेंडूच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

**सायंकाळी पडलेली असतील फुले रस्त्यावर**

झेंडूच्या फुलांना गुरुवार सकाळपर्यंत भाव राहणार आहे. सकाळी १० नंतर मात्र फुलांचे भाव पडायला सुरुवात होईल. घरी परत नेण्यापेक्षा व फेकून देण्यापेक्षा काही व्यापारी जातानाही नफा कमावण्यासाठी ३० रुपयांपर्यंत फुलांचे भाव पाडतील. कारण दुपारी १२ वाजेनंतर या फुलांकडे कोणीही पाहणारा मिळणार नाही. परिणामी शहरात सायंकाळी चौकाचौकात झेंडूच्या फुलांचा सडा पडलेला दिसेल. ही फुले सध्या गारवा असल्याने टवटवीत दिसत आहेत.

# तिवसा तहसीलवर काँग्रेसचा विशाल ट्रॅक्टर मोर्चा

## यशोमती ठाकुरांचा सरकारला आक्रमक इशारा!





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१तिवसा**

तिवसा तालुक्यातील अतिवृष्टी, शेतकऱ्यांच्या नुकसानी आणि सरकारच्या दुर्लक्षी धोरणाचा निषेध करण्यासाठी काँग्रेस पक्षातर्फे आज तिवसा तहसील कार्यालयावर भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचं नेतृत्व माजी मंत्री यशोमती ठाकुर आणि खासदार यांनी केलं. या आंदोलनात तालुकाभरातील शेकडो शेतकरी ट्रॅक्टरसह सहभागी झाले होते.

हा मोर्चा सकाळी ११ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधी स्थळावरून सुरू झाला आणि घोषणाबाजी करत तिवसा तहसील कार्यालयावर पोहोचला. या आंदोलनात शेतकऱ्यांनी शासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांचा तीव्र निषेध करीत सरकार विरोधात जोरदार घोषणा दिल्यातयावेळी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले.

> यशोमती ठाकुर यांनी सरकारवर जोरदार टीका करत म्हणाल्या कीशेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळणाऱ्या सरकारला हे केवळ इशारा आहे. वेळेत मदत न मिळाल्यास काँग्रेस रस्त्यावर उतरेल!
>
> **यशोमती ठाकूर**
> **काँग्रेस नेत्या.**

**या आहेत मुख्य मागण्या**

तिवसा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना सरसकट ५०,००० पर्यंत नुकसानभरपाई द्यावी, शेतकऱ्यांची कर्जमाफी त्वरित जाहीर करावी, पीक विमाचे चार निकष पुन्हा लागू करावेत, शेती खरडून गेलेल्या भागात रोजगार हमी योजनेतून कामे द्यावीत, फळबाग उत्पादक शेतकऱ्यांनाही नुकसान भरपाई मिळावी.

यावेळी वैभव वानखडे अमर वानखडे प्रणव गौरखेडे राजू थोरात सतीश पारधी जसबीर ठाकूर,कल्पना दिवे मुकुंद पुनशे,संदीप आमले लुकेश केणे रितेश पांडव पंकज मोरे निवृत्ती मोकडधम प्रदीप बोके योगेश वानखडे नंदू गोहत्रे राधेश्याम महात्मे अतुल तिखे सुरज धूमनखेडे विलास हांडे जितू ठाकूर सह अनेक शेतकरी प्रामुख्याने उपस्थित होते.

# उद्याला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा सोने समर्पण कार्यक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

परंपरा व प्रथेनुसार श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने उद्या गुरुवार २ ऑक्टोबर २०२५,रोजी सकाळी ९ वाजता डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती केंद्र शिवाजीनगर अमरावती येथे सोने समर्पण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.छत्रपती श्री शिवाजी महाराज, महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री,कर्मयोगी गाडगेबाबा आणि शिक्षण महर्षी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला विजयादशमी निमित्त सोने अर्पणाचा कार्यक्रम श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून खासदार बळवंत वानखडे तसेच प्रमुख अतिथी म्हणून आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्यकारी परिषदेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांची प्रमुख उपस्थिती राहील. कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहावे अशी विनंती संस्थेचे सचिव डॉ.वि.गो ठाकरे यांनी केली आहे.

# राणा दाम्पत्याची अंबा देवी-एकवीरा मातेच्या चरणी अनवाणी महापदयात्रा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आमदार रवि राणा आणि भाजप नेत्या, माजी खासदार सौ. नवनीत राणा यांनी गंगा-सावित्री निवासस्थान शंकर नगर येथून अंबा देवी व एकविरा देवी मंदिरापर्यंत अनवाणी महापदयात्रा काढली.

गंगा-सावित्री निवास - केडिया नगर - राजापेठ - कुथे स्टॉप - राजकमल - गांधी चौक मार्गे ही पदयात्रा निघाली. शेकडो भाविक भक्त सहभागी झाले होते. ठिकठिकाणी राणा दाम्पत्याचं जोरदार स्वागत करण्यात आलं.





अंबा देवी मंदिरात महाआरती करून, एकविरा देवीच्या चरणीही दर्शन घेण्यात आलं. आत्महत्या ग्रस्त शेतकरी, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कुटुंबीयांसह कष्टकरी, बेरोजगार, विद्यार्थी, व्यापारी व गृहिणींच्या जीवनात सुख-समृद्धी यावी, यासाठी देवी चरणी साकडं घालण्यात आलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शेतकऱ्यांच्या समस्यांशी लढण्याची शक्ती मिळावी, अशी प्रार्थनाही राणा दाम्पत्याने केली.

या वेळी संस्थानतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.भाजप व युवा स्वाभिमान पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेकडो भाविक यावेळी उपस्थित होते.

# आजपासून ४ ऑक्टोबर सलग चार दिवस दिसणार फिरती चांदणी

## नवरात्रात नवा थरार; 'अवकाश स्थानका'च्या दर्शनाचे 'चार वार'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अकोला**

वकाशात नवरात्रात नवा थरार अनुभवण्याची संधी उपलब्ध होत आहे. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाचे सलग चार दिवस दर्शन होणार आहे. ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीलाच अवकाश प्रेमींसाठी मोठी संधी उपलब्ध झाली. या अनोख्या खगोलीय घटनेचे साक्षीदार होण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे संचालक प्रभाकर दोड यांनी केले. यंदा पावसाळा भरपूर लांबला आता पावसाने विश्रांती घेतली. आतापर्यंत ढगांच्या गर्दीत लपलेले आकाश देखील स्वच्छ झाले.



रात्री आकाशातील नवनव्या घडामोडींचा आनंद सण-उत्सवाच्या काळात नवे रंग भरत आहेत. १ ते ४ ऑक्टोबर सलग चार दिवस रात्रीच्या प्रारंभी फिरत्या चांदणीच्या स्वरूपात जगातील सर्वात महाग व महाकाय आकाराचे आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन स्थानकाचे दर्शन नुसत्या डोळ्यांनी होईल. हे स्थानक दरताशी सुमारे २८ हजार किलोमीटर वेगाने पृथ्वीपासून सुमारे चारशे कि.मी.अंतरावरुन जाते. दीड तासात एक पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण करते. आपल्या भागातून हे स्थानक जाते, त्यावेळी ते बघण्याची संधी उपलब्ध होईल, असे प्रभाकर दोड म्हणाले

बुधवारी रात्री ७.३८ ते ७.४० यादरम्यान आकाशात उत्तर दिशेच्या जरा पश्चिम भागातील सप्तर्षीच्या शेपटीच्या बाजूने कालेय तारका समूहाकडे जाताना अवकाश स्थानक पाहता येईल.

गुरुवारी सायंकाळी ६.५० ते ६.५५ या वेळी उत्तर दिशेला ध्रुवा जवळून पुढे सरकत राजा वृषपर्वा व राजकन्या शर्मिष्ठा यांच्या मधून ईशान्य दिशेस असलेल्या देवयानी आकाशगंगेच्या वरून पूर्व आकाशात दिसणाऱ्या शनी ग्रहाचे जवळ स्थानक विलुप्त होईल. शुक्रवारी रात्री ७.३९ ते ७.४४ या वेळात पश्चिमेस स्वाती नक्षत्रा जवळून भूजंगधारीतून वृश्चिक व धनु राशीकडे अवकाश स्थानक जाणार आहे. शनिवारी सायंकाळी ६.५१ ते ६.५७ यादरम्यान ठळक स्वरूपात वायव्य ते दक्षिणेस जाताना अवकाश स्थानकाचे दर्शन होईल. या आकाश मार्गावर स्वाती नक्षत्र, भूजंगधारी तारका समूह व वृश्चिक व धनु राशीकडे जाईल, असे प्रभाकर दोड यांनी सांगितले.

# पुण्यात उच्च शिक्षण संचालकांशी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीच्या वतीने पुणे येथील उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांची अलीकडेच भेट घेण्यात आली. समितीचे अध्यक्ष अजय देशमुख व प्रकाश म्हसे यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधी मंडळाने विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा केली.



यावेळी २२ सप्टेंबर २०२५ रोजी प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी लागू करण्यात आलेल्या नवीन वेतनश्रेणीबाबत समितीने सरकारचे व उच्च शिक्षण विभागाचे आभार मानले. मात्र, अजूनही अनेक प्रश्न प्रलंबित असून त्यावर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.प्रमुख मागण्यांमध्ये सातवा वेतन आयोग लागू करणे, आश्वासित प्रगती योजना, रजा रोखीकरण, वैद्यकीय प्रतिपूर्ती, अनुकंपा नियुक्त्या व पदोन्नतीला योग्य वेतनश्रेणी लागू करणे यांचा समावेश होता.डॉ. देवळाणकर यांनी सर्व मागण्यांची गांभीर्याने दखल घेत शासनाशी समन्वय साधून निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. समितीने सरकारला इशारा दिला की, मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास शिक्षकेतर कर्मचारी तीव्र आंदोलन छेडतील.

# टपोरी नेत्यांच्या संपत्तीचे आकडे आमच्याकडे शेतकऱ्यांसाठी १०% द्या! - रवी राणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**

आमदार रवी राणा यांनी दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मदतीचा मुद्दा उपस्थित करत नाव न घेता माजी आमदार बच्चू कडूंवर थेट टीका केली.



आपल्या जिल्ह्यातील टपोरी लोकांची संपत्तीची यादी आमच्याकडे आहे. जे स्वतःला शेतकरी नेते म्हणवतात, त्यांनी आपल्या संपत्तीपैकी किमान १० टक्के रक्कम शेतकऱ्यांसाठी द्यावी. तेव्हा खरी माणुसकी दिसेल, असे रवी राणा यांनी ठणकावले.

ते पुढे म्हणाले, तुम्ही मंत्री होता, राज्यभर गँग घेऊन फिरताय, पण शेतकऱ्यांच्या नावावर दुकानदारी थांबवा. माणुसकी असेल तर मदत करा.अशी टीका बच्चू कडू यांचे नाव न घेता आ.रवी राणा यांनी केली.

दरम्यान, भाजप नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांनीही शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघात केला. उद्धव ठाकरेंकडे कोट्यवधींची संपत्ती आहे, त्यातील वाटा शेतकऱ्यांसाठी द्यावा. फक्त दसऱ्याच्या मेळाव्यात टोमणे मारण्यात वेळ घालवू नये, अशी टीका त्यांनी केली.

त्यांनी उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वशैलीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटलं, मुख्यमंत्री असताना त्यांच्या पायाला कधीही चिखल लागला नाही! असेही नवनीत राणा म्हणाल्यात.

# नवरात्रात स्त्रीशक्तीचा गजर, पण रोषणखेडा येथे विधवा बेघर

## प्रहारच्या ठिय्या आंदोलनाने प्रशासनाला घाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१वरुड**

एका बाजूला नवरात्रोत्सवात देवीची पूजा करून यत्र नार्यस्तु पूज्यन्ते... असा घोष सुरु असताना, दुसऱ्या बाजूला वरुड तालुक्यातील रोषणखेडा येथे एका विधवा महिलेचे घर नायब तहसिलदारांच्या आदेशावरून पाडण्यात आले आणि ती महिला दोन मुलांसह रस्त्यावर आली. प्रशासनाची ही कारवाई केवळ धक्कादायकच नाही तर मानवी संवेदनांना हरवणारी ठरली आहे.घर उद्धवस्त झालेल्या महिलेने मदतीसाठी धाव घेतली, पण कुठूनही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर तिने प्रहार संघटनेकडे धाव घेतली. आणि मग वरुड तालुका प्रहार संघटना अक्षरशः तिच्या मदतीला उभी



राहिली. आज (दि. १ ऑक्टोबर २०२५) प्रहार कार्यकर्त्यांनी महिलेचे घर पाडून बाहेर फेकलेले सामान थेट तहसिल कार्यालयात नेऊन ठेवले. एवढ्यावरच न थांबता उपाशी असलेल्या महिलेबरोबर तहसिलदारांच्या दालनातच जेवण करून ठिय्या आंदोलन सुरु केले. प्रहार तालुका संघटक अजय चौधरी व तालुका प्रमुख प्रणव कडू यांनी थेट प्रशासनाला जाब विचारला ते म्हणाले नायब तहसिलदारांना खरोखर घर पाडण्याचा अधिकार आहे का? न्यायालयाचा आदेश न घेता ही कारवाई कशी केली? नोटीस दिल्याच दिवशी घर पाडणे हा नियम आहे का? या प्रश्नांना तहसिलदार शेळके व सहायक पोलीस निरीक्षक वाघमारे यांनी स्पष्ट उत्तर देऊ शकले नाहीत. शेवटी चूक झाली, यापुढे अन्याय होणार नाही अशा आश्वासनावरच प्रशासनाला पायउतार व्हावे लागले. त्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. यावेळी प्रहार आक्रमण संघटनेचे अध्यक्ष गजानन ब्राम्हणे, प्रहार अपंग क्रांती संघटनेचे विलास पंडागळे, लिलाधर काकडे, अजय बहुरुपी, सुरेश नागले आदींसह कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

**स्त्री शक्तीची थट्टा**

आज नवरात्रात देवीचे गुणगान करणारे समाजमन आणि संवेदनशून्य प्रशासन या दोन टोकांची विसंगती ठळकपणे समोर आली. विधवा महिलेचे घर उद्धवस्त करून तिला बेघर करणाऱ्यांनी स्त्रीशक्तीची थट्टाच उडवली. मात्र प्रहार संघटनेने तिच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरून प्रशासनाला धडा शिकवला.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत